सप्टेंबर, २०२६

# आपलं मंत्रालय

## एक सुसंवाद



अतिथी संपादक

**डॉ. पंकज भोयर**

राज्यमंत्री, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

# गणेशोत्सवाला जागतिक व्यासपीठ!

bappa .org

गाथा गणेशकथांची

जगभर निनादो,
गणपती बाप्पा मोरया!

https://bappa.org/

## ❖ डिजिटल मंच ❖

**देश–विदेशातील घरगुती व**
**सार्वजनिक गणपतींची माहिती एका मंचावर...**

# अंतरंग

## ८ कुमारजी : स्वरांपलीकडचा अंतर्मनाचा शोध

कुमारजी माझे पहिलेपासूनच आवडते गायक! त्यांनी गायलेली कबीराची निर्गुणी भजने सकाळी रेडिओवरच्या 'प्रभात वंदन'मध्ये अर्धवट झोपेत ऐकली तरी शालेय वयात दिवसभर कानात घुंगत राहायची. 'सुनता है गुरुग्यानी' हे जगातलं सर्वश्रेष्ठ गाणं आहे, यावरून कोणाशी तरी घातलेला वादही आठवतो. कुमारजींबद्दलच्या दंतकथा कानावर कधीमधी पडायच्या आणि त्यातून त्यांच्याबद्दलचा आदर अधिकच वाढायचा! पण तरी त्यांची गाणी खास मिळवून ऐकावी किंवा अधिक काही शोध घ्यावा, असे तेव्हा तरी वाटले नाही, एवढे मात्र खरे!

## २९ जिंदगी और कुछ भी नही... तेरी मेरी कहानी है...

आपल्या अवतीभोवती असणारी, नात्याने ग्रहासारखी कक्षेत फिरणारी, सण, उत्सवाला, तोरणात, मरणात नियमित भेटणारी माणसे, साधारणतः आपले जग असते. तरीही या कोषात जगताना, परग्रहावरील अनामिक एलियनसारखे आपल्याला कुणाचे वेड का असावे? ज्यांच्यासोबत आयुष्य जगतोय त्यांना सोडून मनात कुणाच्या तरी भेटीची ओढ, अनामिक हुरहुर का असावी?

## ११ मनडोहातील अनंततरंग

'अनंततरंगा'तून सुख-दुःख, प्रेम, विरह, श्रद्धा, अंधश्रद्धा, धर्म-अधर्म अशी विसंगती कवी नेमकेपणाने प्रतीत करतो. त्याचवेळी त्यात मनाची आणि जगण्याची शोधयात्राही घडते. मनाचा ठाव घेणारा आणि भावनांच्या विविध छटांचे नेटके दर्शन घडवणारा हा काव्यवाचनाचा प्रवास आहे. तो कवीच्या प्रशासकीय व्यस्ततेतून उमललेला आहे. भाषेचा सुटसुटीतपणा, सहज सोपे; पण अर्थवाही शब्द आणि विविध विषयांचे भान यामुळे 'अनंततरंग' हा काव्यसंग्रह वाचकमनावर कोरला जातो.

## ३३ उद्योजकीय भरारी

मसाले उद्योगातील संधी ओळखून त्यांनी 'कृषिदेव मसाले' या उपक्रमाची सुरुवात केली आहे. पारंपरिक खाद्य संस्कृती, गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि आधुनिक उद्योजकतेचा संगम साधत त्यांनी व्यवसाय क्षेत्रात नवी वाट निवडली आहे. त्यांच्या या वेगळ्या करिअर प्रवासाची प्रेरणा काय होती, 'कृषिदेव मसाले'ची संकल्पना कशी आकाराला आली आणि या उद्योगातील त्यांची भविष्यातील वाटचाल कशी असेल, हे जाणून घेऊ या...

## २४ आपल्या स्मार्टफोनमधील एआय : खिशातील अदृश्य शक्ती!

एआयला रोबोटिक्सच्या माध्यमातून शरीर मिळते, तेव्हा ते भौतिक जगात कशी क्रांती घडवते; पण तुम्हाला माहिती आहे का? तुम्हाला एआयचा अनुभव घेण्यासाठी एखाद्या मोठ्या प्रयोगशाळेत किंवा फॅक्टरीमध्ये जाण्याची गरज नाही. तुमच्या हातातील जो 'स्मार्टफोन' आहे, तो आजच्या काळातील सर्वात प्रगत आणि फिरते एआय केंद्र आहे.

## ३६ आनंदी जगणं...

विचार करणं हे माणसाला मिळालेलं सर्वोच्च वरदान. याच विचारांचे फलद्रूप म्हणजे आजवरची प्रगती. विचारांची दिशा योग्य असली की, सर्व उत्तम आणि विचारांची दशा झाली म्हणजे सर्वच अतिउत्तम. सतत एकच विचार मनामध्ये असणं/एकापाठोपाठ सलग विचाररूपी मोत्यांची माळ मनात गुंफत राहणं पर्यायाने अतिविचारास आमंत्रणच.


शालेय शिक्षणातील प्रयोगशील उपक्रम! ६
कुमारजी : स्वरांपलीकडचा अंतर्मनाचा शोध ८
'गामक घर' : पडझड घराची, नात्यांचीही १०
मनडोहातील अनंततरंग ११
शाश्वत अन्न प्रणाली १४
गणेशोत्सवातील 'लोकसंवाद'; जनजागृतीचा सेतू १५
धार्मिक उत्सव म्हणजे गणेशोत्सव! १६
कविता २२-२३
आपल्या स्मार्टफोनमधील एआय : खिशातील अदृश्य शक्ती! २४
वाचाल तर वाचाल... २६
कढी सुरक्षा २७
जिंदगी और कुछ भी नही... तेरी मेरी कहानी है... २९
नाटकाचे प्रेक्षक ३०
'कादंबरी' (भाग-१) ३१
उद्योजकीय भरारी ३३
बिनखांबी गणेश मंदिर ३४
मुख्यमंत्री फेलोशिप : प्रशासनाचा नवा दृष्टिकोन ३५
आनंदी जगणं... ३६
डिजिटल डिटॉक्स म्हणजे काय? ३७
गणेश मंडळांच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी लोकसंवाद अभियान ३८

वर्ष ४ थे । अंक ६ । सप्टेंबर २०२६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

आपलं मंत्रालय

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी
- संपादक — जगदीश मोरे
- सहसंपादक — अर्चना देशमुख, शैलजा पाटील
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — वृंदावन एंटरप्रायजेस प्रा. लि., सिडको बस स्टॉप, ठाणे (प.)

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

**प्रतिक्रियांचे स्वागत**

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची
गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि
सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

# 'बाप्पा डॉट ऑर्ग'वर उलगडणार ४० हजार गावांतील गणेशकथा

महाराष्ट्राच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा आणि सामाजिक एकोपा जगभर पोहोचविण्याच्या उद्देशाने 'बाप्पा डॉट ऑर्ग' (bappa.org) हा डिजिटल मंच विकसित करण्यात आला आहे. या मंचाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सुमारे ४० हजार गावांमधील गणेशोत्सवाच्या परंपरा आणि त्यांच्याशी निगडित कथा जागतिक स्तरावर पोहोचविण्यात येणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुंबईतील द एशियाटिक सोसायटी येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या घरातील गणेशोत्सवाची गाथा या डिजिटल मंचावर अपलोड करून त्याचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी 'बाप्पा रथ' या राज्य सांस्कृतिक चित्ररथाला हिरवा झेंडा दाखविला. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थी आणि शिल्पकारांनी साकारलेली १२ फूट उंचीची मोदकाची कलाकृती हे या चित्ररथाचे प्रमुख आकर्षण आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवातून निर्माण होणारे सामाजिक अभिसरण, समाजातील एकोपा, उत्साह आणि ऊर्जा यांची जगाला ओळख व्हावी; तसेच बाप्पाचा उत्सव जागतिक स्तरावर पोहोचून त्याला जागतिक वारशाचा दर्जा मिळावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

भारतासह आशियातील अनेक देशांमध्ये श्री गणेशाची आराधना केली जाते. जपानसारख्या देशातही गणेशाची मंदिरे आहेत. बालगणेशापासून सार्वजनिक गणेशोत्सवापर्यंत बाप्पाशी असलेले भावनिक नाते, विविध भागांतील श्रद्धा, परंपरा आणि उत्सवाचे सामाजिक स्वरूप व्यापक स्तरावर मांडण्याचा प्रयत्न या मंचाच्या माध्यमातून केला जाणार आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून 'मोदक' विविध ठिकाणी नेण्यात येणार असून, त्याच्या प्रवासाच्या माध्यमातूनही बाप्पाशी संबंधित विविध कथा आणि सांस्कृतिक परंपरा लोकांपर्यंत पोहोचविण्यात येतील.

# प्रयोगशील शिक्षणातून विकसित महाराष्ट्राकडे!

बदलत्या काळातील आव्हाने स्वीकारत विकासाची नवी क्षितिजे गाठण्यासाठी शिक्षणातील नावीन्यपूर्ण उपक्रम, शासन आणि नागरिक यांच्यातील संवाद, तंत्रज्ञानाचा योग्य वापर, सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि पर्यावरण संवर्धन या बाबींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आधुनिकतेचा स्वीकार करताना मानवी मूल्यांचे जतन करणे आणि विकासाच्या प्रक्रियेत समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. शिक्षणापासून उद्योजकतेपर्यंत आणि सांस्कृतिक वारशापासून शाश्वत विकासापर्यंत विविध क्षेत्रांत सुरू असलेले प्रयत्न महाराष्ट्राच्या प्रगतीला नवी दिशा देणारे आहेत.

या विविध पैलूंचा वेध 'आपलं मंत्रालय'च्या सप्टेंबर २०२६च्या अंकातून घेण्यात आला आहे. राज्यातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक वाटचालीचे दर्शन घडविणाऱ्या या अंकात प्रयोगशील शिक्षण, लोकसहभागातून जनजागृती, डिजिटल माध्यमांतून सांस्कृतिक वारशाचे जतन, तंत्रज्ञानाचा योग्य वापर, शाश्वत अन्नप्रणाली आणि उद्योजकतेच्या नव्या संधी अशा विविध विषयांचा समावेश आहे. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि सर्जनशीलता विकसित करणारे असावे. बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षणात विविध प्रयोगशील उपक्रम राबविण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी'सारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना विज्ञान केंद्रे आणि संशोधन संस्थांना भेट देण्याची संधी उपलब्ध होत आहे. जागतिक स्तरावरील नासा व भारतातील इस्रोसारख्या संस्थांमधील अभ्यासभेटींमुळे विज्ञान आणि अंतराळ संशोधनाची प्रत्यक्ष ओळख निर्माण होते. आधुनिक तंत्रज्ञानाधारित अध्यापन, डिजिटल वर्गखोल्या, विज्ञान प्रदर्शने आणि पर्यावरणविषयक उपक्रम यांमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि जिज्ञासेला प्रोत्साहन मिळते. ग्रामीण, आदिवासी आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसह सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे, ही प्रगत महाराष्ट्राच्या उभारणीसाठी महत्त्वाची बाब आहे.

यासोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना, पीएम श्री व सीएम श्री या योजनांमुळे शासकीय शाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये वृद्धी होणार आहे. विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या ज्ञानवृद्धी व कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस ॲण्ड असेसमेंट या संस्थेशी करार करण्यात आला आहे. या करारामुळे इयत्ता सहावी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'क्लायमेट क्रेस्ट' या विशेष उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील पारितोषिकप्राप्त विद्यार्थी, शिक्षक, प्रयोगशाळा साहाय्यक आणि परिचर यांच्या रोख पारितोषिकांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे.

शिक्षणाप्रमाणेच शासन आणि नागरिक यांच्यातील संवादही समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा आहे. शासनाच्या योजना आणि उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचणे, त्यांच्या अपेक्षा व समस्या समजून घेणे आणि विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे, यामुळे लोकशाही अधिक बळकट होते. याच विचारातून गणेशोत्सवाच्या काळात राबविण्यात आलेला 'लोकसंवाद' हा उपक्रम विशेष उल्लेखनीय आहे. महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा ही राज्याची ओळख आणि अभिमान आहे. काळानुसार माध्यमे बदलत असली, तरी परंपरेचे महत्त्व कायम आहे. 'बाप्पा डॉट ऑर्ग' या डिजिटल व्यासपीठाच्या माध्यमातून राज्यातील सुमारे ४० हजार गावांमधील गणेशोत्सवाच्या परंपरा, गणेशकथा आणि सांस्कृतिक वारसा जागतिक स्तरावर पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. स्थानिक परंपरांना जागतिक व्यासपीठ मिळाल्यामुळे सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याबरोबरच नव्या पिढीला आपल्या मातीशी जोडून ठेवण्यास मदत होते.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, स्मार्टफोन आणि डिजिटल माध्यमांनी मानवी जीवनात मोठे परिवर्तन घडविले आहे. माहितीची उपलब्धता, संवादाची गती आणि कामकाजाची कार्यक्षमता वाढविण्यात तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. स्मार्टफोनमधील कृत्रिम बुद्धिमत्ता दैनंदिन जीवनातील अनेक कामे सुलभ करत असली, तरी तिचा योग्य वापर करण्यासाठी सजगता गरजेची आहे. डिजिटल माध्यमांचा अतिवापर टाळणे, मानसिक आरोग्य जपणे आणि प्रत्यक्ष मानवी संवादासाठी वेळ देणे, यांचे महत्त्वही वाढले आहे.

महाराष्ट्राचे वैभव केवळ भौतिक प्रगतीत नसून त्याच्या साहित्यिक, सांस्कृतिक आणि वैचारिक परंपरेतही सामावलेले आहे. या अंकातील साहित्यिक आणि सांस्कृतिक लेखनातून मानवी मनाच्या विविध छटा आणि समाजजीवनातील संवेदनशील पैलू समोर येतात. 'कुमारजी : स्वरांपलीकडचा अंतर्मनाचा शोध' या लेखातून कुमार गंधर्व यांच्या संगीतप्रवासाचा वेध घेतला आहे. 'अनंततरंग'मधून मनाच्या विविध छटा उलगडतात; तर 'गामक घर'सारख्या कलाकृतीतून बदलत्या काळातील घर, कुटुंब आणि नातेसंबंध यांचे चित्र उलगडते. 'वाचाल तर वाचाल' या लेखातून वाचनसंस्कृतीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. अशा लेखनातून वाचकांना आत्मचिंतनाची संधी मिळते आणि समाजाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन विकसित होतो.

मंत्रालयातील विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्यातील साहित्यिक व सांस्कृतिक गुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने 'आपलं मंत्रालय' मासिकाच्या माध्यमातून त्यांना आपले विचार, साहित्य आणि कलागुण सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. 'आपलं मंत्रालय'च्या पुढील अंकासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**डॉ. पंकज भोयर**
(अतिथी संपादक)

# शालेय शिक्षणातील प्रयोगशील उपक्रम!

**डॉ. पंकज भोयर,** राज्यमंत्री, शालेय शिक्षण.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचे राज्यमंत्री म्हणून डॉ. पंकज भोयर यांच्या कार्यकाळात राज्यातील शालेय शिक्षण पद्धतीला नवीन दिशा देणारे प्रयोगशील प्रयत्न करण्यात आले आहे. केवळ पारंपरिक अभ्यासक्रमापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना आधुनिक विज्ञानाची जोड देणे, त्यांच्यात शोधवृत्ती निर्माण करणे आणि त्यांना जागतिक पातळीवरील घडामोडींशी जोडणे यावर त्यांनी विशेष भर दिला. ग्रामीण व दुर्गम भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांपासून ते शहरी भागातील विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांना समान व उच्च दर्जाच्या शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य सातत्याने त्यांनी केले.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शालेय शिक्षण विभाग आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस ॲण्ड असेसमेंट इंडीया दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर केंब्रिजच्या वतीने आंतरराष्ट्रीय शिक्षण गटाचे व्यवस्थापकीय संचालक रॉड स्मिथ आणि राज्याच्या वतीने शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंग देओल उपस्थित होते.**

## मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी उपक्रम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या विशेष पुढाकारातून राबवण्यात आलेला 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' हा उपक्रम राज्यातील शालेय शिक्षणाच्या इतिहासात अत्यंत मैलाचा दगड ठरला आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून त्यांनी विज्ञान समजून घ्यावे, यासाठी हा उपक्रम आखण्यात आला. या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये त्रिस्तरीय निवड प्रक्रियेद्वारे तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना थेट जगातील व देशातील सर्वोत्तम विज्ञान संशोधन संस्थांना भेट देण्याची सुवर्णसंधी देण्यात आली.

या उपक्रमांतर्गत तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना रमण सायन्स सेंटर नागपूर, पिंपरी-चिंचवड सायन्स सेंटर, पुणे आणि नेहरू तारांगण, मुंबई यांसारख्या प्रसिद्ध सायन्स सेंटर्सची अभ्यासभेट घडवून आणली गेली. त्यानंतर जिल्हा स्तरावर चमकणाऱ्या सर्वसाधारण, दिव्यांग आणि विशेषतः आदिवासी घटकातील तब्बल १८० गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या शिक्षकांना बंगळुरू येथील भारताच्या 'इस्रो' या अंतराळ संशोधन केंद्राला भेट देण्याची संधी मिळाली. या उपक्रमाचे सर्वोच्च शिखर म्हणजे राज्यस्तरीय गुणवत्तेत अव्वल ठरलेल्या ५५ विद्यार्थ्यांच्या तुकडीला थेट अमेरिकेतील जगातील अग्रगण्य अंतराळ संशोधन संस्था 'नासा'च्या शैक्षणिक दौऱ्यावर पाठवण्याची ऐतिहासिक योजना आखली गेली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य घरातील मुलांनी 'नासा' आणि 'इस्रो'सारख्या ठिकाणी जाऊन थेट शास्त्रज्ञांशी संवाद साधणे, हे स्वप्न या उपक्रमामुळे सत्यात उतरले.

## केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस ॲण्ड असेसमेंट संस्थेशी करार

विज्ञानासोबतच आजच्या युगातील सर्वात गंभीर अशा हवामान बदलाच्या जागतिक समस्येविषयी शालेय विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य प्रस्थापित करण्यात आले. शालेय शिक्षण विभागाने केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस ॲण्ड असेसमेंट या संस्थेशी ऐतिहासिक सामंजस्य करार केला. या करारांतर्गत राज्यातील इयत्ता सहावी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'क्लायमेट क्रेस्ट', विशेष ई-लर्निंग सत्रांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना हवामान बदल, जागतिक तापमानवाढ, कार्बन फूटप्रिंट आणि शाश्वत विकास यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सखोल ज्ञान मिळाले. या स्पर्धेत व उपक्रमात यशस्वी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना केंब्रिज विद्यापीठातर्फे अधिकृत प्रमाणपत्र प्रदान केले गेले. ज्यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रोफाईलला जागतिक स्तरावर मान्यता मिळण्यास मदत झाली.

## पायाभूत सुविधांमध्ये वाढ

शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शाळांच्या भौतिक व प्रशासकीय रचनेतही सुधारणा केल्या. राज्यभरातील शासकीय व जिल्हा परिषदेच्या

**अमरावती येथील शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्रांगणात आयोजित राज्यस्तरीय बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनी समारोप कार्यक्रम.**

शाळांमध्ये 'डिजिटल क्लासरूम' आणि स्मार्ट बोर्डची सोय करून अध्यापनप्रक्रिया अधिक रंजक व दृक्श्राव्य माध्यमांवर आधारित करण्यात आली. शाळांमध्ये स्वच्छता आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत 'स्वच्छ शाळा – सुंदर शाळा' मोहिमेद्वारे विशेषतः विद्यार्थिनींसाठी स्वच्छ स्वच्छतागृहांची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली.

**नागपूर येथील प्रो.राजेंद्रसिंह सायन्स एक्सप्लोरेट्रीमध्ये आयोजित विशेष कार्यक्रमात राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रात्यक्षिकांची पाहणी केली.**

## विज्ञान प्रदर्शनातील उत्तेजनार्थ पुरस्कार रकमेत वाढ

शासनाने २४ मार्च २०२६ रोजी निर्गमित शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील पारितोषिकपात्र विद्यार्थी, शिक्षक, प्रयोगशाळा साहाय्यक आणि परिचर यांच्या रोख पारितोषिकांच्या रकमेत शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून वाढ केली आहे. प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकासाठी ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३१ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी २१ हजार रुपये आणि चतुर्थ क्रमांकासाठी ११ हजार रुपये; तसेच तीन उत्तेजनार्थ पारितोषिकांसाठी प्रत्येकी १० हजार रुपये देण्यात येणार आहेत.

प्राथमिक विद्यार्थी गटात सर्वसाधारण, आदिवासी आणि दिव्यांग; तसेच माध्यमिक विद्यार्थी गटात सर्वसाधारण, आदिवासी आणि दिव्यांग अशा प्रवर्गांचा समावेश आहे. शिक्षक गटात प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, तर स्वतंत्र गटात प्रयोगशाळा साहाय्यक अथवा परिचर यांचा समावेश करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या विज्ञान आणि गणित विषयांतील सर्जनशीलता, कल्पकता व नवनिर्मितीच्या वृत्तीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनासह विविध उपक्रम राबविण्यात येतात. तालुकास्तरापासून सुरू होणाऱ्या या प्रदर्शनातील विजेते जिल्हास्तरावर आणि त्यानंतर राज्यस्तरावर सहभागी होतात. राज्यस्तरावर गुणानुक्रमे निवडलेल्या प्रदर्शनीय वस्तूंची पुढील वर्षीच्या राष्ट्रीय प्रदर्शनासाठी निवड केली जाते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील संशोधनाभिमुख व सर्वसमावेशक दृष्टिकोनासह 'इन्स्पायर', 'बिल्डॅथॉन' आणि 'हॅकेथॉन' यांसारख्या विज्ञानाधारित उपक्रमांमध्ये राज्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पारितोषिकांची रक्कम वाढविण्यात आली आहे.

एकंदरीत विचार करता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन व शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या सहकार्याने राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या कार्यकाळात शालेय शिक्षण विभागाने स्थानिक पातळीवरील पायाभूत सुविधा बळकट करण्यापासून ते विद्यार्थ्यांना 'नासा' व 'केंब्रिज' संस्थेसारख्या आंतरराष्ट्रीय मंचांपर्यंत पोहोचवण्यापर्यंत अत्यंत संतुलित आणि आक्रमक शैक्षणिक धोरण राबवले. विज्ञानाची प्रयोगात्मक आवड, आंतरराष्ट्रीय हवामान साक्षरता आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड या त्रिसूत्रीमुळे महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल अपेक्षित आहे.

**शब्दांकन : निलेश तायडे,** विभागीय संपर्क अधिकारी.

# कुमारजी : स्वरांपलीकडचा अंतर्मनाचा शोध

डॉ. किरण कुलकर्णी

...तो प्रकार सुरू झाला, तेव्हा मी जम्मू शहरात होतो. महिनाभर मुक्कामासाठी! इलेक्शन ऑब्झर्व्हर म्हणून ड्युटी लागली होती. रात्रभर जागा, एक प्रकारची अस्वस्थता, झोप येत नव्हती. काहीतरी जबरदस्त म्युझिकल ऐकायला हवे, अशी भावना. यू-ट्युबवर वेगवेगळी गाणी ट्राय केली. शेवटी परवीन सुलतानाच्या 'हमें तुमसे प्यार कितना' या 'कुदरत' चित्रपटातल्या गाण्याने थोडीशी शांतता मिळाल्यासारखे वाटले; पण अजून काही तरी हवेसे वाटत राहिले.

त्यानंतर तसे घडले ते दिल्ली मुक्कामी! दिल्लीत वर्षभर माझे पोस्टिंग होते, तेव्हा अनेक रात्री उशिरापर्यंत हेडफोन लावून शास्त्रीय किंवा सुगम संगीत ऐकत बसायचो. डोक्यातल्या विचारचक्राबरोबर डोळे मिटून संगीताची साथ निराळे समाधान द्यायची. तिथे सर्वांत जास्त ऐकले ते कुमार गंधर्व! काहीतरी अनवट आकर्षण त्यांच्या गायनाबद्दल वाटत होते, ते वाढतच चालले!

कुमारजी माझे पहिलेपासूनच आवडते गायक! त्यांनी गायलेली कबीराची निर्गुणी भजने सकाळी रेडिओवरच्या 'प्रभात वंदन'मध्ये अर्धवट झोपेत ऐकली तरी शालेय वयात दिवसभर कानात घुंगत राहायची. 'सुनता है गुरुग्यानी' हे जगातलं सर्वश्रेष्ठ गाणं आहे, यावरून कोणाशी तरी घातलेला वादही आठवतो. कुमारजींबद्दलच्या दंतकथा कानावर कधीमधी पडायच्या आणि त्यातून त्यांच्याबद्दलचा आदर अधिकच वाढायचा! पण तरी त्यांची गाणी खास मिळवून ऐकावी किंवा अधिक काही शोध घ्यावा, असे तेव्हा तरी वाटले नाही, एवढे मात्र खरे!

त्यानंतर कुमारजी भेटले. थेट बारावीच्या मराठीच्या पुस्तकात लेखक म्हणून! लता मंगेशकरबाबत लिहिलेल्या त्यांच्या लेखात लतादीदींच्या तीन मिनिटांच्या गाण्याची तुलना त्यांनी तीन तासांच्या शास्त्रीय संगीताच्या मैफलीशी थेट केली होती. हे धाडस मला तेव्हाही अजबच वाटले होते आणि त्यांच्या विचारांमधला उमदेपणा, खुलेपणा, खरेपणा आणि बंडखोरी कुठेतरी हृदयाला स्पर्शून गेली. बाकीच्या गुणांपेक्षा त्या वयाला अनुसरून मला बंडखोरीच अधिक भावली. कुमारजींचा वेगळेपणा जाणवायला सुरुवात झाली, ती तेव्हापासून!

त्या वयात विचारातल्या बंडखोरीचं मला एक प्रकारचं आकर्षणच वाटायचं. अजूनही वाटतं. विशेषतः सभोवतालच्या संदर्भचौकटीला लाथाडणारी वैचारिक बंडखोरी मला जवळची वाटते. ज्ञानेश्वर, कुसुमाग्रज, आशा भोसले, कुमार गंधर्व ही माझी तेव्हाही दैवतं होती आणि अजूनही आहेत. त्याच कारण या सर्वांमध्ये मला वैचारिक बंडखोरीचं समान सूत्र आढळतं आणि या मंडळींनी त्यांची बंडखोरी केवळ वैचारिक पातळीवर न ठेवता हिमतीने आचरणातून आणून यश मिळवले, हे मला आदर्शवत वाटतं. आपणही असंच वागायचा प्रयत्न करावा, ही प्रेरणा मिळत राहते. तर ते असो.

कॉलेजमध्ये असताना कुठून तरी मिळालेली कुमारजींच्या मराठी नाट्यगीतांची कॅसेट दिवसातून पन्नास वेळा ऐकण्याचा विक्रमही अनेकदा घडला. मध्येच एकदा एका श्रीमंत नातेवाईकाच्या घरी 'मला उमजलेले बालगंधर्व' ही कुमारजींची कॅसेट ऐकायला मिळाली. तेव्हा फारशी ती रुचली नाही आणि खरे सांगायचे तर उमजलीच नाही. 'झाकोळ' या मराठी सिनेमातली कुमारजींची लाइव्ह मैफल याच काळात पाहिली, पण कुमारजींपेक्षा सिनेमाच्या कथेच्या अनुषंगाने असलेली दृश्ये जास्त लक्षात राहिली.



त्यानंतर आली कुमारजींच्या निधनाची बातमी! तेव्हा फारसे काही वाटले नाही; पण त्यानंतर पुणे आकाशवाणीच्या एका गाण्याच्या कार्यक्रमात सगळी कुमारजींची गाणी लागली, तेव्हा कान देऊन ऐकताना आतल्या आत हुंदके दाबत राहिलो, तेवढे मात्र आठवते. या तीर्थक्षेत्राचे दर्शन हुकलेच. कुमारजींच्या विस्मयकारक चरित्रकथेचे तुकडे मात्र संधी मिळताच झेलत राहिलो. एका स्पर्धेत बक्षीस म्हणून

मिळालेले कुमारजींच्या संगीत गप्पांचे पुस्तक, त्यातला त्यांचा दांडगा अभ्यास आणि खोली बघून मीच फार खोलात गेलो नाही.

तर दिल्लीतल्या मुक्कामी शोधता-शोधता कुमारजींचे 'गीतवर्षा' सापडलं. डोळे मिटून, हेडफोन लावून अनेकदा ऐकलं. तो स्तिमित करणारा अनुभव होता. शांत करणारा अनुभव होता. त्यातली अनेक गाणी, त्यांच्या धून आणि कुमारजींचा आवाज आठवत राहतो. वसुंधराताईंची जबरदस्त साथ प्रभाव टाकून जाते. कुमारजींच्या रेकॉर्डेड मुलाखती ऐकायला मिळाव्या आणि माझ्या मनाने त्यांना कुसुमाग्रजांच्या जोडीने माझा 'सांस्कृतिक बाप' मानले. कुमारजींच्या व्यक्तिमत्त्वाने मला भारून टाकले. शोधून-शोधून त्यांच्या मैफली नेटवरून ऐकल्या, गाणी ऐकली. त्यांच्याबरोबरच्या 'ऋणानुबंधाच्या गाठी' अधिकच घट्ट झाल्या! तरी क्लायमॅक्स अजून यायचाच होता!

कलकत्त्याला फाऊंडेशन ट्रेनिंगसाठी महिनाभर होतो, ही जानेवारी २०१७ ची गोष्ट! दिनक्रम आटोपून गुडूप झोपल्यावर रात्री १२च्या सुमारास अस्वस्थ जाग! काहीतरी जबरदस्त म्युझिकल ऐकायला हवे, अशी भावना. नेटवर शोधता शोधता आपसूकच 'गीतवर्षा'पर्यंत पोहोचलो. कुमारजींच्या गायनाचे गारूड सुरू झाले; पण क्लायमॅक्सला जाईना. तो क्लायमॅक्स साधला गेला – 'ओ दिलदारा आ जा रे' खमाज टप्पा आहे. जबरदस्त, स्वर्गीय आणि अद्वितीय. पुन:पुन्हा ऐकले. हेच ते डेस्टिनेशन.

मग रिसर्च आणि शोधाशोध. यू-ट्युबवर हे गाणे तीन प्रकारे आहे. रेकॉर्डेड 'गीतवर्षा'मध्ये एक तास विसाव्या मिनिटाला, लाइव्ह कॉन्सर्टमध्ये एक तास आठव्या मिनिटाला आणि एकट्या कुमारजींचा सहा मिनिटांचा खमाज टप्पा. आधीच्या दोन्ही 'गीतवर्षा'मध्ये वसुंधराताईंची साथ आहे. रेकॉर्डेड 'गीतवर्षा'मध्ये जेवढी समरस साथ आहे, त्यापेक्षा लाइव्ह 'गीतवर्षा'मध्ये कणभर कमी आहे; पण कुमारजी जबरदस्त, सोलोपेक्षा साथीनेच जास्त खुललेले; पण प्रतिभेचा पसारा तसाच फुललेला. नवे प्रयोग, नव्या ताना, नवी वजने यांची आतषबाजी. प्रत्यही नव्या जागा. त्या माहोलमध्ये, सुरांमध्ये मनसोक्त डुंबणारे कुमारजी. त्यांच्याच रंगात. आपण इतरांना काय दैवी देणं देतोय, याचं भानसुद्धा नाही. सूर्याप्रमाणे, सूर्याला जसे आपल्यामुळे निसर्गचित्रात रंग भरले जात आहेत याची जाणीवही नसते, तसेच! आनंदसोहळा!

तामिळनाडूमधल्या अरियालूर या ठिकाणी इलेक्शन ऑब्झर्व्हर म्हणून महिनाभराच्या ड्युटीवर असताना कडलूर सर्किट हाऊसची अशी एक अविस्मरणीय रात्र! सगळे आटोपून पलंगावर आडवा झालो. झोपायचा प्रयत्न आणि अचानक 'ओ दिलदारा' ऐकण्याची ओढ. नेटवर शोधून ऐकू लागलो आणि आनंदातिरेकाने डोळ्यातून घळघळ अश्रू! ज्ञानोबा-तुकोबाला विठूमाऊली पाहून जे होत असेल, ते त्या स्वरब्रह्माला ऐकून झाले. आनंदाचे डोही आनंद तरंग. मस्तकामध्ये चैतन्यमयी लाट. थकवा, मरगळ, शीणवटा दूर!

हा काय प्रकार असेल? असे का घडत असेल? माझे विज्ञाननिष्ठ तर्कवादी विचार माझ्या या अवस्थेचे पृथक्करण करायला लागले. अध्यात्मातील चैतन्यमयी समाधी अवस्थेसारखे याचेही विश्लेषण, पृथक्करण शक्य नाही, हे मला मान्य नाही. कशाला करायची अशी चिरफाड, हेही मला पटत नाही. माझ्या मनोव्यापारातील हा उन्मेष नक्की निर्माण कसा झाला, हे जाणून घेण्याची मला उत्सुकता आहे. किंबहुना तो माझा हक्क आहे. मानवाच्या आदिम शोधभावनेचा माझ्या डीएनएमधला अंतिम अंश म्हणा हवं तर... विज्ञानाधिष्ठित कार्यकारणभावाचं सूत्र इथेही लागू असणार. मला सापडेल किंवा शोधूनही कदाचित सापडणार नाही; पण शोधयात्रेचा आनंद तर मिळेल! या शोधयात्रेत मूळ क्लायमॅक्समधलं चैतन्य किंवा त्यातला आनंद मी हरवून बसेन, याची मला बिलकूल भीती वाटत नाही. एकतर तसे होणार नाही, असे वाटतेय आणि समजा, तसे झालेच तर झाले! काय हरकत आहे. आयुष्यात नवीन क्लायमॅक्सचा आनंद निर्माण होण्याची शक्यता तयार होईल. एवढेच ना! मग हे तर चांगलेच की! डीएनएमधला अंतिम अंश अजूनही जागृत आहे, याचे शुभलक्षणच की!

ही शोधयात्रा मानसशास्त्राच्या प्रांतातली असणार आहे. तो अनोळखी प्रदेश आहे. 'मनाचिये गुंफी' असलेले अंधारकोपरे दिसण्याची शक्यता आहे. तसेच नव्याने उजळणाऱ्या अनेक प्रकाशवाटा दिसण्याची शक्यता आहे. मी उत्सुक आहे धुंडाळायला! शोधयात्रेचा पहिला टप्पा स्वतःचे 'अपब्रिंगिंग' तपासणे हाच असणार. त्या काळाच्या डोहात वाकून पाहण्याचा प्रयत्न करतो आहे. त्यातल्या तरंगाच्या स्पर्शाने आजही तेव्हाच्याच भावना स्पर्श करत असल्याचा भास होतो आहे. सुखदुःख ते दुःखद या रेंजमध्ये लांबाकारासारख्या हेलकावणाऱ्या भावना!

माझ्या वडिलांशी माझी खूपच अटॅचमेंट होती. त्यांच व्यक्तिमत्त्व, त्यांचा काळ, काळापरत्वे आजूबाजूची परिस्थिती आणि त्यांचा विचारव्यूह यांचे प्रतिनिधी म्हणून तर मी कुमारजींकडे बघत नाहीये ना! माझ्या वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा अनुभव कुमारजींच्या प्रभावशाली गायनातून मिळतोय काय? तसे असेल तर इतर तत्सम गायकांच्या गायनातून का मिळत नाही? किंवा कुमारजींच्या प्रत्येक गाण्यातून का मिळत नाही?

पहिल्या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. माझ्या मनावर वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचे जे इम्प्रेशन किंवा ठसा आहे, त्याला समरूप शोधत राहण्याचा माझा प्रयत्न, अर्थातच अबोध मनातला – काही साम्यस्थळं सापडताच पूर्णत्वाचा निःश्वास टाकत असावा. दुसऱ्या प्रश्नानुसार इतर हा मुद्दाच गैरलागू ठरतो. कुमारजींपेक्षा वेगळ्या वैशिष्ट्याचे अनेक गायक आहेत; पण ओव्हरऑल व्यक्तिमत्त्व, त्या व्यक्तिमत्त्वाची आचार-विचारांशी सांगड आणि गायनातून अभिव्यक्ती ही प्रत्येकच गायकाची एकमेवाद्वितीय असणार, मग इतर तत्सम हा मुद्दा राहतोच कुठे? कदाचित कुमारजींच्या गायनाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे माझ्या प्रबोध आणि अबोध मनापुढे जसे आणि जेवढे परिष्करण झाले, तसे आणि तेवढे इतर कोणाचे झाले नसेल. शेवटी माझे जग माझ्या मेंदूएवढेच आहे ना!

तिसरा प्रश्न मात्र अनुत्तरितच राहतो. कुमारजींच्या प्रत्येकच गाण्याबाबत माझे असे का होत नसावे? याचे उत्तर शोधण्यासाठी डिडक्टिव्ह लॉजिकपेक्षा इंडक्टिव्ह लॉजिक वापरणे मी पसंत करीन. म्हणजे कुमारजींच्या एकूण गाण्यांचा तुलनात्मक विचार करण्यापेक्षा या एकाच गाण्यावर लक्ष केंद्रित करीन का? तर ते सोपे आहे म्हणून, तरीही उत्तर न सापडल्यास दुसरी पद्धत वापरता येईल.

(सचिव, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन.)

# ‘गामक घर’ : पडझड घराची, नात्यांचीही

**प्रशांत साजणीकर**

गावातलं घर आता नाहीये. काळाच्या ओघात ते टिकणं कठीणच होतं. नोकरी–धंद्याच्या निमित्ताने मुलं बाहेर गेली. लेकी लग्न होऊन सासरी गेल्या. आजी–आजोबा असेपर्यंत त्या घराला घरपण होतं. मुलींना हक्काचं माहेर होतं. नातवांना आजोळ होतं. उन्हाळ्याच्या सुट्टीत आणि सणासुदीला लग्नसमारंभाला सगळा गोतावळा घरात जमायचा. मुलं, लेकी, जावई, सुना, नातवंडांनी घर गजबजून जायचं. तीन मजली घर सगळ्यांना आनंदाने सामावून घ्यायचं. माजघरातल्या उखळीजवळ बसून आजी हातातल्या रवीने ताक घुसळत तिचं हे सगळं वैभव समाधाने पाहत बसलेली दिसे.

घर मोठं असलं तरी साधं होतं. आजीला झोपण्यासाठीचा पलंग सोडला, तर फर्निचर असं काहीच नव्हतं. सुट्टीच्या दिवसात वीसेक माणसं घरात असायची. पाटावर बसून जेवणं व्हायची. बसायला आणि झोपायला सतरंज्या आणि जाजमं असायची. पुढची माडी, मागची माडी असं करत सगळी मंडळी सामावून जायची. दोन वेळा चहा व्हायचा आणि सगळी मंडळी चहाला एकत्र यायची. एकच टॉयलेट असूनही कधीच कोणाची गैरसोय व्हायची नाही. (हल्ली घरात तीन माणसांना किमान दोन कमोड लागतात.)

आजी–आजोबांच्या पश्चात मात्र घराची पडझड सुरू झाली. केवळ भिंतीच नव्हे, तर नात्यांना पण तडे जायला लागले. लेकींचं हक्काच माहेर संपलं. नाती संपून केवळ व्यवहार उरला. शंभरपेक्षा जास्त वर्षे पोराबाळांना अंगावर खेळवलेल्या त्या घराने शेवटी अखेरचा श्वास घेतला. आता त्या तीन मजली घराच्या केवळ आठवणी उरल्यात. ही आमच्या घराची गोष्ट.

विकासाच्या रेट्यात असं होणं अपरिहार्य आहे. काळाचा पट उलगडत गेला तर अशी स्थित्यंतरे शेकडो वर्षांपासून चालत आलेली असतीलच. तरीही इतर प्राण्यांप्रमाणे घर हे माणसासाठी केवळ निवारा आणि सुरक्षा एवढ्यापुरतंच मर्यादित नसतं. माणसाचं कर्तृत्व, प्रतिष्ठा, सन्मान, सामाजिक स्थान, कुटुंब असे अनेक पदर घर या वास्तूला असतात. त्यामुळे घर हा एक जैविक घटक होऊन जातो. त्यामुळे प्रगती, विकास, परिस्थितीच्या रेट्यात घरापासून दूर होणं, घर तुटणं याचे खोलवर परिणाम माणसाच्या आणि एकूणच समाजाच्या मनावर होत असतात.

अचल मिश्रा लिखित आणि दिग्दर्शित ‘गामक घर’ या मैथिली भाषेतील चित्रपटात हा विषय अत्यंत सुंदर रितीने हाताळला आहे. बिहारमधल्या छोट्याशा गावातलं एक टुमदार घर. काळाच्या तीन खंडात इथली माणसं एकत्र येतात. पहिला कालखंड आहे सन १९९८ चा. घरातल्या एका लहान मुलाच्या स्वागताच्या निमित्ताने सगळा परिवार एकत्र आला आहे. वडीलधारे आजी–आजोबा आहेत. सगळी मुलं, नातवंड आलीत. हसतं खेळतं प्रसन्न घर आहे. एकमेकांबद्दल जिव्हाळा आहे. पत्ते खेळणारे ज्येष्ठ, व्हीसीआर पाहणारी तरुण मंडळी, आंबे खाणारी मुलं, जेवणावळी चालू आहेत असा सगळा आनंदी माहोल आहे.

दुसरा कालखंड २०१० चा आहे. आता बरेच बदल दिसत आहेत. घरातल्या भिंतीवरचे रंग फिके पडलेत आणि माणसांतला पूर्वीचा ओलावापण कमी झालेला दिसतोय. विकासाच्या खुणा दिसत आहेत. आधी एकच छोटा कॅमेरा. फोटोसाठी सगळा परिवार एकत्र जमवत होता. आता मात्र डिजिटल झालेला कॅमेरा प्रत्येकाचे वेगवेगळे फोटो घेण्यात रमला आहे. बोलण्यात औपचारिकता आहे. तरुण जुन्या आठवणीत रमले आहेत.

तिसरा कालखंड २०१९ चा आहे. आता घरात कोणीच राहत नाही. एखाद्या निरुपयोगी वस्तूकडे दुर्लक्ष व्हावं, तशी अवस्था घराची झालेली आहे. एक–एक आठवणी उघडून टाकाव्यात, तशी उरली–सुरली कौलं काढायचं काम चाललेलं आहे. बॅकग्राऊंडला आधी जिथे पक्ष्यांचे आवाज यायचे, तिथे गावात कर्ण्यावर वाजवत असलेल्या गाण्याचे स्वर ऐकू येत आहेत. घर जमीनदोस्त होण्याची वाट पाहत आहे.

‘गामक घर’ ही केवळ एका गावातल्या घराची किंवा एका कुटुंबाची गोष्ट नाही. काळाच्या ओघात घर, कुटुंबव्यवस्था, रीतीरिवाज, कुटुंबातल्या सदस्यांचे एकमेकांबद्दलचे संबंध, विकास आणि प्रगतीच्या नावावर ओस पडत चाललेली खेडी अशा अनेक गोष्टींवर हा चित्रपट भाष्य करतो. सत्तर–ऐंशीच्या दशकांत जन्मलेल्या अनेकांना हा चित्रपट पाहताना आपल्याच गावाकडच्या घराची गोष्ट पाहतोय असे वाटेल. या चित्रपटाचं वैशिष्ट्य म्हणजे एकही व्यावसायिक कलाकार यात नाही. यातले सगळे कलाकार ही त्या गावातलीच मंडळी आहेत. घर हे या चित्रपटातले खरे मुख्य पात्र आहे आणि आनंद बंसल या सिनेमेटोग्राफरने ज्या नितांत सुंदर पद्धतीने हे घर आणि त्यात हळूहळू होत जाणारे बदल दाखवले आहेत त्याला तोड नाही. एक–एक फ्रेम पाहत राहावी अशी आहे. घराच्या भिंती, खिडक्या, रंग, अंगणातले तुळशी वृंदावन, दारातली वेल हे सारं आपल्याशी बोलू लागतं. चित्रपटात अर्थातच गाणी नाहीत; पण आंशुमन शर्मा यांचं संगीत त्यातल्या साधेपणाने लक्ष वेधून घेतं.

बदल हा सृष्टीचा नियम आहे; परंतु नव्वदीच्या दशकानंतर ज्या वेगाने हे बदल होत आहेत, तो वेग अचंबित करणारा आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून साधारण १९९८ ते २०१९ अशा विसेक वर्षात गावातलं घर, त्यातली माणसं, त्यांच्यातले नातेसंबंध यामध्ये जे बदल होत गेले, त्याचे नितांत सुंदर असे चित्रण हा सिनेमा करतो. काही समीक्षकांनी हा चित्रपट म्हणजे बिहारची पाथेर पांचाली आहे, असं कौतुक केलं आहे. आचल मिश्रा या तरुण दिग्दर्शकाचा हा पहिलाच चित्रपट. घर या विषयावर मैथिलीसारख्या प्रादेशिक भाषेत इतका तरल चित्रपट तयार होतो, ही गोष्ट भारतीय सिनेमाच्या दृष्टीन आश्वासक आहे. शंकर ब्रम्हे समाजविज्ञान ग्रंथालय आणि सिनेमोंटाज, नागपूर यांच्यामुळे हा चित्रपट पाहता आला, त्याबद्दल त्यांचे आभार. काही वेगळं आणि सुंदर पाहण्याची आवड असेल, तर हा चित्रपट अजिबात चुकवू नये असा आहे. चित्रपट मुबी आणि यू–ट्युबवर सबटायटलसह उपलब्ध आहे.

**चित्रपट** – गामक घर (२०१९), **दिग्दर्शक** – अचल मिश्रा,
**वेळ** – १ तास ३१ मि.

**(सहसचिव, महाराष्ट्र शासन व सहव्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ.)**

# मनडोहातील अनंततरंग




**जगदीश मोरे**

विद्यार्थ्यांच्या वस्तूंचे प्रदर्शन भरणार होते. कोणी सुंदर चित्रे काढली होती, कोणी कागदी फुले बनविली होती. श्यामजवळ कोणतीही हस्तकला नव्हती. त्याला वाईट वाटत होते. उदास श्यामला एकनाथने विचारले, ''श्याम, अलीकडे तुझा चेहरा का बरे काळवंडला? तू काही बोलत नाहीस?''

श्याम खिन्नपणे म्हणाला, ''एकनाथ, तुम्ही सारी मुले प्रदर्शनासाठी काही ना काही करून नेणार आहात. मी काय नेऊ? मी निरुपयोगी आहे. माझ्या बोटात कोणतेच कसब नाही, कोणतीच कला नाही. फुकट आहेत ही बोटे!''

''श्याम, तू एक, वस्तू तयार कर. मी सांगू?''

''सांग! काय बरे करता येईल मला?''

''श्याम, तू एक सुंदरशी कविता कर!''

''एकनाथ, कविता म्हणजे का हस्तकला? कविता म्हणजे हृदयाची कला!'' श्याम उत्स्फूर्तपणे म्हणाला.

'अनंततरंग' काव्यसंग्रहाचा रसास्वाद घेताना साने गुरुजींच्या 'धडपडणारा श्याम'मधील हा संवाद आठवला. कवी अजय भोसले यांच्या या काव्यसंग्रहातील कविता थेट हृदयाला भिडणाऱ्या आहेतच; परंतु ती त्यांच्या हृदयातली कला असली तरी त्यांच्या बोटांतही कला आहे. त्यांच्या बोटांतली कला आणि कसब 'अनंततरंग'च्या मुखपृष्ठावर उमटले आहे. हे मुखपृष्ठ त्यांनी स्वत: रेखाटले आहे.

श्री. भोसले यांनी रंग, आकार, रेषा आणि पोतच्या साहाय्याने स्त्री मनाच्या भावना मुखपृष्ठातून प्रदर्शित केल्याचे जाणवते. त्यातून अनेक अर्थ प्रवाहित होऊ शकतात. विविध रंगांचे स्ट्रोक किंवा आडव्या-तिडव्या मुक्त रेषा उधळत आणि भौमितिक आकारांतून चित्रकार भोसले कॅनव्हासवर काही तरी सांगू पाहत आहेत; परंतु त्यापेक्षाही ते चित्र-मुखपृष्ठ पाहताना आपल्याला काय वाटते? काय भावते? हे जास्त महत्त्वाचे आहे. कारण काव्यरसिक म्हणून आपण स्वत:च्या अंतर्मनातील अनुभूतीच्या अंगाने चित्रातील विविध घटक, रंगसंगती जोडत चित्राचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करत असतो. कारण प्रत्येकाची नजर सारखी असू शकते; परंतु 'दृष्टी'त फरक असतो!

बहुरंगी मुखपृष्ठ पलटवल्यावर काळ्या रंगांच्या ओळी नजरेतून हृदयात जात असताना अनंत रंगांचे अनंत तरंग आपल्याच अंतर्मनावर उमटू लागतात. काव्यसंग्रहाच्या प्रारंभी मनाच्या शांत तळ्यात एखाद्या आठवणीचा खडा पडल्याचा भास होतो आणि असंख्य विचारांचे तरंग आपल्याच मनात दाटू लागतात. एकामागून एक पृष्ठ पलटवत पुढे-पुढे जाताना काव्यरसिक या काव्यडोहात खोलखोल डुबत जातो.

'अनंततरंगा'तून सुख-दु:ख, प्रेम, विरह, श्रद्धा, अंधश्रद्धा, धर्म-अधर्म अशी विसंगती कवी नेमकेपणाने प्रतीत करतो. त्याचवेळी त्यात मनाची आणि जगण्याची शोधयात्राही घडते. मनाचा ठाव घेणारा आणि भावनांच्या विविध छटांचे नेटके दर्शन घडवणारा हा काव्यवाचनाचा प्रवास आहे. तो कवीच्या प्रशासकीय व्यस्ततेतून उमललेला आहे. शासकीय नस्त्यांवरच्या सहीसाठी पेन वापरणाऱ्या एखाद्या अधिकाऱ्याच्या लेखणीला संवेदनशीलतेची झालर असू शकते, याची साक्ष मंत्रालयात अवर सचिव म्हणून कार्यरत असलेले अजय भोसले यांच्या 'अनंततरंग'मधील कविता देत राहतात. त्यांच्या मनात साठलेल्या भावना लेखणीतून पाझरू लागतात,

*कित्येकदा मनात साचलेलं,*
*कित्येकदा मनात दाटलेलं,*
*शब्दावाटे बाहेर पडताना,*
*अव्यक्त अश्रू होऊन गाठलेलं...*

अनंत स्वरूपाच्या तरंगातून साकारलेल्या आणि 'अनंततरंग' म्हणून प्रकटलेल्या या काव्यधारा आहेत. कवी भोसले अश्रूंशी संवाद साधतात आणि त्यातून काव्य उमलते. 'तिची खंत'तून ते जाणवते,

*...तेव्हा एक खंत*
*मनात सलते*
*आणि*
*एक कविता*
*अश्रू होऊन ओघळते...*

पावसाची सर येऊन गेल्यानंतर किंवा चालू असतानाच अचानक उन्हाची किरणे येतात आणि सप्तरंगी इंद्रधनुष्य दिसू लागतो. प्रकाशाचे अपवर्तन, अपस्करण आणि अंतर्गत परावर्तन आदींच्या एकत्रित परिणामातून आकाशात अद्‌भूत दृक्‌परिकल्पना आकार घेते. मनाचेही त्याहून वेगळे काही नसते. मनालाही स्वत:च्या वर्तन-परिवर्तनातून पाऊस बहुरंगी दिसू लागतो. त्याच बहुरंगी पावसाची रूपे कवी भोसले यांनी कवितेतून उलगडून दाखविले आहेत,

*कुणाच्या डोळ्यांतून वाहणारा,*
*कुणाच्या डोळ्यांत नाचणारा पाऊस,*
*कुणाची आस पाऊस,*
*कुणाचे भास पाऊस...*

दिवाळी-दसरा म्हणजे सुगीचे दिवस; पण यंदा राज्यभर दुष्काळाची दाहकता आताच जाणवू लागली आहे. कविवर्य ना. धो. महानोर पावसाची आळवणी करताना म्हणतात, या नभाने या भूईला दान द्यावे आणि माझ्या पापणीला पूर यावे. पाऊस नसताना शेतकऱ्याची स्थिती अत्यंत करुणाजणक असते. तो देवाचा धावा करतो. यंदा तर शेतकऱ्यांच्या डोळ्यात पावसाअभावी अश्रू दाटले आहेत. हेच भान जपत शेतकऱ्याच्या वेदनेचे दाहक चित्र अजय भोसले यांनी चितारले आहे. त्यांच्या 'दुष्काळ' कवितेतले वर्णन थेट काळजाला भिडते,

*काय त्याचा रुसवा असा,*
*का जीवघेणा अबोला,*
*कसणाऱ्या हातांनाही,*
*का त्याचा दुरावा...*

माणसा-माणसांतील बदलत जाणारे बंध, अंतर आणि जिव्हाळा यांवर कवीची सूक्ष्म दृष्टी दिसते. आता सगळेच शहाणे आहेत. व्यवहारी आहेत; पण संपूर्ण जगच आभासी झाले आहे. त्याला नाती तरी कशी अपवाद असतील. नात्यांची सैल होत जाणारी वीण कवीला अस्वस्थ करते. ती अस्वस्था 'वेडी माणसं'मधून प्रकटते,

*आपलं उखळ पांढरं करणारी मग पिढी आली,*
*थोडी व्यवहारी, थोडी शहाणी,*
*अन् आपल्याच व्यवहाराची शिकार झाली,*
*कारण त्या पुढची पिढी अजून कोरडी निघाली,*
*त्यांची नाती आभासी, आभासी जगातली...*

धर्म किंवा जाती-पातींच्या कलकलाटात माणूस म्हणून जगणे आपण विसरत चाललो आहोत की, याची भीती सतावू लागते. आपल्याला मात्र समतेचा, समभावाचा मोठा वारसा आहे; परंतु तो फक्त प्रासंगिक असतो का? असा प्रश्न कवीला पडतो,

*देवाच्या वारीला निघताना विरघळलेली तुझी जात*
*परतताना पुन्हा अवतीर्ण होऊ लागते,*
*मुक्त झालेली गात्रं, मोकळं झालेलं मन*
*पुन्हा तुझ्या प्रभावाने कोमेजू लागते...*

मराठी ही आपली मातृभाषा आणि ती आपल्याला प्रिय आहे; परंतु मराठी भाषक आपसात भाषेवरून भांडू लागतात. आपल्या अभिजात भाषेला वेगळ्याच वादातून जावे लागते. त्यावर 'माय मराठी' कवितेतून भाष्य करताना म्हटले आहे,

*माय ज्ञानेशाची, माय तुकयाची,*
*झुंज फिजूल, ऱ्हस्व दीर्घांची,*
*हा शाप जुनाच मराठी मातीचा,*
*स्वर स्वरादीतून मार्ग शोधते ती...*

मराठीच्या असंख्य बोली आहेत. त्यांच्यात काना-मात्रा, ऱ्हस्व-दीर्घांचा फरक साहजिकच आहे; परंतु याची शुद्ध, त्याची अशुद्ध, असे लेबल लावले जातात. प्रमाण भाषेचे माहात्म्य कथन करताना बोलींकडे दुर्लक्ष होते, ते टाळले गेले पाहिजे, असे येथे कवी सूचवित आहे, असे वाटते. त्यावरून ज्ञानपीठ विजते भालचंद्र नेमाडे यांच्या 'साहित्याची भाषा' या पुस्तकाची आठवण झाली. त्यात ते नमूद करतात, महाराष्ट्रात पुणेरी मराठी प्रमाण भाषा मानली गेली असेल, तर हा पुणेरी बोलीचा केवळ मोठेपणा नसून, इतर भागांतल्या बोलींचा तो मोठेपणा आहे. कारण या सामंजस्यामुळेच सबंध मराठी भाषकांचा एकजिनसीपणा टिकून आहे.

मुंबई आणि मराठीचे नाते अतूट आहे; तसेच व्यस्त माणसांचा गजबजाट, ही मुंबईची ओळख आहे. ही मायानगरी सर्वांवर प्रेम करते; परंतु भयाण डोळे असलेल्या पाषाणी चेहऱ्याच्या राक्षसांनी इथे घडविलेला रक्तपात आठवला की, आजही मन सुन्न होते. त्याचे वर्णन करताना कवी म्हणतो,

*रडली माय मुंबादेवी,*
*थिजली जमीन रक्ताने,*
*विदीर्ण मने, तुटली स्वप्ने,*
*विकट कसाबी हास्याने...*

माणूस म्हणून जगताना समर्पणभाव जपावाच लागतो; पण समर्पणाच्या धुंदीत स्वत:चेच अस्तित्व गमावून बसण्याची वेळ येऊ नये; तसेच माणसाने समर्पण बाजूला सारण्यासाठी टोकाची आत्ममग्न वृत्तीही बाळगता कामा नये, तेच खालील ओळीतून प्रतीत होते,

*दिशा खुणावतील*
*धुक्यात केव्हातरी,*
*हाक न द्यावी*
*इतकंही आत्ममग्न नसावं...*

माणसाला एकटेपणाची भीती सतावत असते. एकटेपणा जीवघेणा असतो. भोवताल अंधारला जातो; पण त्याकडेही सकारात्मकतेने पाहता आले पाहिजे. स्वत:लाच स्वत:ची कंपनी देता आली पाहिजे,

*नेहमीच कोण साथ देणार,*
*त्यांच्या परिघात कोण घेणार,*
*म्हणून कोणी फक्त आपलं असावं,*
*नाही तर एकटं असावं...*

तारकांची भाषा नाही कळली तरी फरक पडत नाही; पण अंधारातले प्रकाशकण वेचता आले पाहिजेत. जीवन एक अविरत प्रवाह आहे. त्यात

भिजत पुढे जायचे असते. त्यात भलेबुरे अनुभव येतात. आठवणींची साठवण होते; पण त्या सगळ्याच रमणीय नसतात,

*काही तुकडे आठवणींचे*
*अस्वस्थ करतात,*
*काही तुकडे आठवणींतून*
*वजा करावेसे वाटतात...*

अजय भोसले यांची 'तुम्हीच ठरवायचं' ही कविता वाचताना व. पु. काळेंच्या काही ओळींची आठवण होते. नव्या कोऱ्या करकरीत दिवसाचे स्वागत कसे करायचे, हे आपणच ठरवायचे, यावर वपुंच्या सुंदर ओळी आहेत. त्याच धर्तीवर परिस्थितीला कसे सामोरे जायचे, या संदर्भातली कविता महत्त्वाची वाटते,

*हसायचं की रडायचं,*
*तुम्हीच ठरवायचं,*
*जीवनाचा सुंदर ताल,*
*बेसूर काळ व्हायचं...*

मनात अनेक भावना दाटून येतात. भावनांचा कल्लोळ सुरू होतो. त्या व्यक्त कशा कराव्यात, ते कळत नाही. मनाचा कोलाहल उपसता येत नाही. भयाण शांततेत खिन्नता जाणवत राहते. मग मन बंड करू पाहते. त्यावर कवी लिहितो,

*मला मुक्त, व्यक्त व्हायचंय,*
*समाजाने लादलेल्या विचारातून,*
*स्वत:शी होणाऱ्या प्रतारणेतून...*

**दुःख आणि जगण्याचा शोध :** दुःखाचा केवळ शोक न करता, त्यातून मार्ग काढत आशेचा नवा किरण कसा शोधावा, याचा एक अर्थपूर्ण सूर या कवितांमध्ये सापडतो. दुःखाला केवळ एक वेदना न मानता, त्यातून मार्ग काढत जगण्याचा अर्थ शोधण्याचा सूर या कवितांमध्ये सापडतो. आर्तता, समर्पण आणि अबोल भावना कवीने अत्यंत हळुवार शब्दांत मांडल्या आहेत,

*गुंफण्या आधीर मन*
*सुख दु:खाची माळ,*
*क्षण मृगजळ जरी*
*उगवेल सोनेरी काळ...*

कवी भोसले यांच्या कविता 'माणूस' संकल्पनेभोवती काव्यरसिकांचे लक्ष वेधून घेतात. संतांच्या शिकवणीचे त्या स्मरण करून देतात. श्रद्धा जपताना दुसऱ्याच्या सोयी–गैरसोयींचेही भान देण्याचा प्रयत्न या कविता करतात. विज्ञानाने दिलेल्या सिद्धतेचा विचार कधी केलाय का? माणसांत देव का दिसत नाही? असा प्रश्न या कविता उपस्थित करतात,

*संतवचन म्हणे देव माणसात,*
*तुज कसा नाही दिसला,*
*का कर्मकांडात तू फसला,*
*करूनी मर्कटलीला,*
*झालाय तुझा खुळखुळा...*

माणसाच्या आतल्या अव्यक्त, अनाकलनीय आणि समृद्ध अंतरंगाचा शोध कवीने या कवितांमधून घेतला आहे. जगणे म्हणजे काय? जगण्यातले अनेक क्षण जाणिवांनी मोहरलेले असतात; परंतु काही क्षण भकास आणि होरपळलेलेही असतात. हा केवळ एका कवीचा अनुभव नसून, सामान्य माणसाच्या रोजच्या जगण्यातील संघर्षाचे आणि भावविश्वाचे ते प्रतिबिंब आहे,

*हेच तर अस्तित्व आहे*
*माझं, जगण्याचं,*
*जगण्याकडे वेगळ्या*
*परिप्रेक्ष्यातून पाहण्याचं...*

नाती ही रेशमाच्या धाग्यासारखी असतात; धागे सैल सोडल्यास गुंता वाढतो. आवळून धरले तर धागे तुटण्याचा धोका असतो. गुंता टाळण्यासाठी नाती हळुवारपणे समजून घ्यावी लागतात. नाहीतर काळजावर ओरखडे उमटतात. आपल्याच माणसांत आपण विचलित होतो, तीच भावना कवीने नेमक्या शब्दांत मांडली आहे,

*जग बाभळीचे काटे,*
*खरचटले अवघे मन,*
*रक्तबंबाळ बंबाळ,*
*आपल्याच जगात...*

पुरुषी व्यवस्थेत किंवा मानसिकतेत मुलींचे जगणे असह्य होते. त्यांच्या जगण्याचा आणि लग्नाचाही बाजार मांडला जातो. यातून मुलींचा जन्मच नाकारला जातो. कळ्या उमलण्याआधीच खुडून टाकल्या जातात. त्याचा परिणाम म्हणून पुरुषी मानसिकतेनेच मांडलेल्या बाजारात आता लग्नाळू मुलांचे विवाहच जमणे दुरापास्त झाले आहे. त्यावरचे प्राजक्त देशमुख यांचे 'तो एक राजहंस' हे नाटक पाहण्यासारखे आहे. त्याची आठवण 'मुलीच्या बापाने का झुकावं' ही कविता वाचताना होते,

*आभाळानं नाडावं, हुंड्यानं जाळावं,*
*पोरीनं जिवाला का मुकावं?*
*मुलीच्या बापानं का झुकावं?*

'मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर' यातून कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी मनाचे वर्णन केले आहे. खरेतर मनाचा कुणालाच थांगपत्ता लागत नाही. तरीही कवी येथे मन उकलताना दिसतो,

*मनाचे मनाशी खेळ सारे,*
*मन मनास सावरेना, तू व्हावे मन माझे...*

भाषेचा सुटसुटीतपणा, सहज सोपे; पण अर्थवाही शब्द आणि विविध विषयांचे भान यामुळे 'अनंततरंग' हा काव्यसंग्रह वाचकमनावर कोरला जातो. भोवतालच्या जगण्याकडे आणि सृष्टीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघण्यास या कविता भाग पाडतात,

*या काजव्यांच्या प्रकाशात*
*दिसतेय लख्ख सुंदर वाट,*
*बदललंय कुठं काय?*
*तुमच्या दृष्टिकोनाशिवाय...*

'अनंततरंगा'तील कवितांमध्ये विषयांचे वैविध्य आहे. कवीने एकाच चौकटीत स्वतःला साचू दिलेले नाही. हा काव्यसंग्रह केवळ एका कवीचे मनोगत नाही. ते प्रत्येकाच्या मनातील भावनांचे, संघर्षाचे आणि आशेचे प्रतिबिंब आहे. फायलींच्या दुनियेत वावरतानाही कवी भोसले यांनी टिपलेले हे भावविश्व प्रत्येक वाचकाला स्वतःच्याच अंतर्मनात डोकावायला भाग पाडते. नोकरीच्या व्यस्ततेत जिथे आकड्यांची आणि नियमांची जुळवाजुळव करावी लागते, तिथेच कवीच्या हृदयात भावनांचे शब्द जुळून येतात, हे 'अनंततरंग' वाचताना जाणवत राहते.

**(प्र. उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.)**

# शाश्वत अन्न प्रणाली

**डॉ. प्रकाश कोंडेकर**

मानवी अन्न म्हणजे शरीराला ऊर्जा, पोषण, वाढ, शरीराची दुरुस्ती आणि चांगले आरोग्य टिकवण्यासाठी आवश्यक असलेले खाद्यपदार्थ.

अन्नाचे प्रमुख स्रोत वनस्पती आणि प्राणी आहेत. धान्ये, कडधान्ये, भाज्या, फळे, दूध व दुग्धजन्य पदार्थ, अंडी, मांस, मासे, तेलबिया आणि सुका मेवा हे महत्त्वाचे अन्नपदार्थ आहेत.

अन्नातील प्रमुख पोषक घटक म्हणजे कर्बोदके, प्रथिने, चरबी, जीवनसत्त्वे, खनिजे, तंतू आणि पाणी. संतुलित आहार घेतल्याने शरीराची चांगली वाढ होते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि पोषणाच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्या टाळता येतात. थोडक्यात, अन्न हे मानवी आरोग्य, ऊर्जा आणि निरोगी जीवनाचा मूलभूत आधार आहे.

## शाश्वत अन्न प्रणाली म्हणजे काय?

शाश्वत अन्न प्रणाली म्हणजे अशी अन्नव्यवस्था जी वर्तमान आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित, पौष्टिक, परवडणारे आणि आरोग्यदायी अन्न उपलब्ध करून देते. तसेच पर्यावरणाचे संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि शेतकरी व अन्न क्षेत्रातील कामगारांचे आर्थिक कल्याण सुनिश्चित करते.

## शाश्वत अन्न प्रणालीचे प्रमुख घटक

१. **शाश्वत शेती :** मातीचे आरोग्य, जैवविविधता आणि पाण्याचे संवर्धन करणाऱ्या शेती पद्धतींचा वापर करणे.

२. **अन्न व पोषण सुरक्षा :** प्रत्येक व्यक्तीला पुरेसे, सुरक्षित आणि पौष्टिक अन्न नियमितपणे उपलब्ध होणे.

३. **नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर :** पाणी, जमीन आणि ऊर्जेचा काटकसरीने व योग्य पद्धतीने वापर करणे.

४. **अन्नाची नासाडी कमी करणे :** उत्पादनापासून ग्राहकापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर अन्नाची होणारी हानी आणि नासाडी कमी करणे.

५. **अन्न उत्पादन :** हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करून हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्याची क्षमता वाढवणे.

६. **शाश्वत अन्नप्रक्रिया :** ऊर्जा–बचत करणारे तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा आणि पर्यावरणपूरक पॅकेजिंगचा वापर करणे.

७. **जबाबदार पुरवठा साखळी :** शेतापासून ग्राहकापर्यंत अन्नाची सुरक्षित, जलद आणि कार्यक्षम वाहतूक व साठवणूक सुनिश्चित करणे.

८. **शेतकऱ्यांना योग्य मोबदला :** शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ, योग्य किंमत, तंत्रज्ञान आणि आर्थिक स्थैर्य उपलब्ध करून देणे.

९. **परिपत्र अर्थव्यवस्था (Circular Economy) :** अन्नप्रक्रियेतील उपउत्पादने आणि कचऱ्यापासून पशुखाद्य, कंपोस्ट, जैवइंधन किंवा इतर उपयुक्त उत्पादने तयार करणे.

१०. **ग्राहक जागरूकता :** स्थानिक, हंगामी, पौष्टिक आणि पर्यावरणपूरक अन्नपदार्थांच्या वापराला प्रोत्साहन देणे.

## शाश्वत अन्न प्रणालीचे महत्त्व

**शाश्वत अन्न प्रणालीमुळे :–**

- अन्न व पोषण सुरक्षा सुधारते.
- माती, पाणी आणि जैवविविधतेचे संरक्षण होते.
- अन्नाची नासाडी आणि प्रदूषण कमी होते.
- अन्न उत्पादनाचा कार्बन फूटप्रिंट कमी करता येतो.
- शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होते.
- लोकांना आरोग्यदायी आहार मिळण्यास मदत होते.
- हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या अन्नसंकटाचा सामना करण्याची क्षमता वाढते.

शाश्वत अन्न प्रणालीमध्ये शेतकरी, अन्नप्रक्रिया उद्योग, वाहतूक व्यवस्था, विक्रेते, ग्राहक आणि पर्यावरण यांचा परस्पर संबंध असतो. 'शेतापासून ताटापर्यंत' पर्यावरणपूरक, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार अन्नव्यवस्था निर्माण करणे, हे शाश्वत अन्न प्रणालीचे मुख्य उद्दिष्ट आहे.


(BSc (Hons), MD (Homeo), ND, AVR, FRSH (London), BTER
मानद संचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी.)

# गणेशोत्सवातील ‘लोकसंवाद’ जनजागृतीचा सेतू

**काशीबाई थोरात**

गणेशोत्सवासाठी एकत्र येणाऱ्या नागरिकांपर्यंत शासकीय योजना आणि लोकहिताचे उपक्रम पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा ‘लोकसंवाद’ उपक्रम प्रभावी माध्यम ठरला.

चिंचपोकळी, लालबाग आणि माझगाव परिसरातील विविध गणेश मंडळांच्या ठिकाणी १८ व २३ सप्टेंबर रोजी राबविलेल्या या उपक्रमामुळे कल्याणकारी योजना, नशामुक्ती, रोजगार, अन्न व औषध प्रशासन आणि जलसाक्षरता या विषयांची माहिती नागरिकांना एकाच ठिकाणी मिळाली.

नागरिकांचा मोठा सहभाग असणाऱ्या गणेश मंडळांच्या माध्यमातून संवाद साधल्याने विविध शासकीय विभागांची माहिती थेट लोकांपर्यंत पोहोचली. परिसरनिहाय राबविलेल्या उपक्रमाने नागरिकांच्या परिचित सार्वजनिक ठिकाणांना जनजागृतीचे व्यासपीठ दिले. शासकीय योजना आणि सामाजिक अभियानांची माहिती एकत्रितपणे मांडणे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

चिंचपोकळी परिसरातील चिंचपोकळीचा चिंतामणी आणि बदक रंगारी गणेश मंडळ; तसेच लालबाग परिसरातील बाल युवक गणेश मंडळ आणि तेजुकाया सार्वजनिक गणेश मंडळ येथे १८ सप्टेंबर रोजी हा उपक्रम राबविण्यात आला. त्यानंतर २३ सप्टेंबर रोजी माझगाव परिसरातील अखिल अंजीरवाडी मंडळ, मस्करेहांस रोड, ताराबाग सार्वजनिक मंडळ, घोडपदेव सार्वजनिक मंडळ, घोडपदेव लव लेन सार्वजनिक मंडळ आणि माझगाव दक्षिण सार्वजनिक गणेश मंडळ येथे जनजागृती करण्यात आली. यामुळे ‘लोकसंवाद’ची व्याप्ती तीन महत्त्वाच्या परिसरांतील नागरिकांपर्यंत विस्तारली.

इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती हा उपक्रमाचा महत्त्वाचा भाग होता. विभागाचे सहसंचालक नाईक यांनी नागरिकांशी संवाद साधून विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. त्यामुळे कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना थेट संबंधित विभागाच्या माध्यमातून मिळाली.

‘नशामुक्त मुंबई, महाराष्ट्र’ अभियानाचा संदेशही गणेश मंडळांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. पोलीस यंत्रणेतील अधिकारी आणि विभागीय संपर्क अधिकाऱ्यांनी या अभियानाची माहिती देत नशामुक्तीविषयी जागरूकता निर्माण केली. सामाजिक हिताच्या संदेशाच्या प्रसारासाठी उत्सवातील सामूहिक सहभागाचा सकारात्मक उपयोग या उपक्रमातून झाला.

मुंबईत २९ सप्टेंबर रोजी आयोजित रोजगार मेळाव्याची माहितीही नागरिकांना देण्यात आली. रोजगाराच्या संधींशी संबंधित उपक्रमाबरोबरच अन्न व औषध प्रशासन विभागाचे कार्य आणि जलसाक्षरतेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. त्यामुळे कल्याणकारी योजनांपासून रोजगारापर्यंत आणि आरोग्यविषयक जागरूकतेपासून जलसाक्षरतेपर्यंत विविध विषय नागरिकांसमोर आले.

वेगवेगळ्या प्रशासकीय विभागांची माहिती स्वतंत्रपणे शोधण्याऐवजी ती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्याचे काम ‘लोकसंवाद’ने केले. चिंचपोकळी, लालबाग आणि माझगाव या परिसरांना जोडणाऱ्या या उपक्रमामुळे शासकीय योजना, सामाजिक अभियान आणि लोकहिताच्या उपक्रमांचा संदेश गणेशोत्सवातील व्यापक लोकसहभागातून नागरिकांपर्यंत पोहोचला.

लोकसंवाद कार्यक्रमांमध्ये इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सहसंचालक नाईक, पोलीस निरीक्षक ओवाळे, पोलीस उपनिरीक्षक सागर घाडगे, साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक किरण वाघ, विभागीय संपर्क अधिकारी काशीबाई थोरात, निलेश तायडे, धोंडीराम अर्जुन आणि गजानन पाटील यांनी सहभाग घेतला.

**(विभागीय संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन.)**

# धार्मिक उत्सव म्हणजे गणेशोत्सव!

**अश्विनी शिंदे-पवार**

नुकताच गणेशोत्सव पार पडला. आपल्या महाराष्ट्रामध्ये सार्वजनिकरीत्या अत्यंत उत्साहाने आणि सर्व सामाजिक स्तरांतून मान्यताप्राप्त असलेला धार्मिक उत्सव म्हणजे गणेशोत्सव होय. हिंदू धर्मीयांचा हा उत्सव असला, तरी अनेक अन्य धर्मीय लोक आनंदाने या सामाजिक उत्सवात आपल्याकडे सहभागी होताना दिसून येतात.

गणपती ही बुद्धीची देवता! ६४ कलांचा अधिष्ठाता आणि प्रत्येक शुभकार्याच्या प्रसंगी आपण गणपतीची आराधना करतो. गणेशाच्या मूर्तीकडे किंवा प्रतिमेकडे पाहिले, तरी एक प्रसन्नतेची आणि उत्साहाची लहर जनमनांत पसरते. गणेश हा लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्वांना प्राणप्रिय वाटतो.

गणपतीच्या प्रत्येक अवयवामागे आणि अलंकारामागे माणसासाठी एक संदेश लपला आहे. गणपतीचे शिर/मस्तक हे त्याच्या धडाच्या तुलनेत आकाराने मोठे आहे. शीर हे आपल्या संपूर्ण शरीराचे प्रतिनिधित्व करत असते. एक प्रकारे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा रिप्रेझेंटेटिव्ह जणू! मोठे शीर हे अथांग ज्ञान, अफाट बुद्धिमत्ता, सद्सद्विवेकबुद्धी यांचे प्रतीक आहे. आपले आयुष्य जगताना इतरांच्या डोक्याने नाही, तर आपल्या विचारांचा आपल्यावर संपूर्ण ताबा ठेवून वागण्याची जाणीव गणपतीचे मस्तक करून देते. या मस्तकावर असणारे मोठे कान म्हणजेच बोलण्याआधी किंबहुना बोलण्यापेक्षा श्रवण अधिक करावे हेच दर्शवते. 'सुश्रावकता' ही खूप महत्त्वाची कला आहे. आपण इतरांचे चांगले गुण आत्मसात करण्याची पहिली पायरी म्हणजे आपण आधी ऐकून घेतले पाहिजे. गणपतीला 'शूर्पकर्ण' असे म्हणतात, हे म्हणजेच सुपासारखे कान! जे उत्तम श्रोता होण्याची शिकवण देतात. मोठ्या मस्तकावर असणारे डोळे मात्र लहान! असे का बरे असावे? लहान डोळे आपला 'फोकस' दर्शवतात. आपल्या कामावरील एकाग्र आणि सूक्ष्म दृष्टी दर्शवतात. सूक्ष्मदृष्टी ही बाह्य जगापेक्षा स्वतःच्या अंतर्गत डोकावण्याची नजर देते. अंतर्मनावर व सखोल निरीक्षणावर लक्ष केंद्रित करण्यास सांगते. गणपतीची सोंड ही अत्यंत शक्तिशाली मानली जाते. संतुलन आणि लवचिकतेचे ती प्रतिनिधित्व करते. गणपतीच्या सोंडेचे डावे किंवा उजवीकडे असणे हे प्रसंगानुसार घ्यावयाच्या निर्णयाचे प्रतीक मला वाटते. गणपतीचा एक दात अखंड, तर दुसरा तुटलेला दाखवला जातो. म्हणून बाप्पाला 'एकदंत' असेही म्हटले जाते. पौराणिक कथेनुसार देव श्रीगणेशाने लेखन करताना लेखणी तुटल्यावर आपला दात तेथे वापरला, अशी आख्यायिका सांगितली जाते. यावरून आपले कर्तव्य पार पाडताना करावयाच्या त्यागाची ही परिसीमाच होय.

गणपतीचे नावच 'लंबोदर'... मोठे पोट म्हणजे सहनशीलता आणि सर्वांना सामावून घेण्याची समज होय. गोपनीयता राखणे, उदारता दाखवणे, जगातील सर्व चांगल्या-वाईट गोष्टी पचवण्याची ताकद ठेवण्याचे सूचक म्हणजे गणपतीचे उदर आहे. *'अन्याय माझे कोट्यानं कोटी, मोरेश्वरा बाळ तू घाल पोटी...'* असे भाविक म्हणून तर आर्ततेने गातात. गणपतीचे चार हात म्हणजे माणसाच्या आयुष्यातील चार अवस्था! पूर्वीच्या काळी समजले जाणारे चार आश्रम आणि धर्म, अर्थ, काम, मोक्ष होय. आपल्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर विहित कर्तव्य पार पाडण्याची प्रेरणा बाप्पा देतो. चार हातांमध्ये असणारी आयुधे, त्यापैकी पाश हे मानवाच्या वाईट वृत्तीला बांधून ठेवण्याचे प्रतीक, तर अंकुश म्हणजे वाईट वासना षट् विकारांवर अंकुश म्हणजेच नियंत्रण ठेवण्याचे प्रतीक दर्शवते. गणपतीचे दोन हात हे आदेशात्मक आणि दोन हात हे निर्देशात्मक आहे, यातही संतुलन आहे. एका हातात गोड मोदक म्हणजे आपल्या प्रयत्नांना मिळणारे अंतिम यश, इच्छापूर्ती आहे. मोद म्हणजे आनंद! 'क' म्हणजे देणारा...आनंद देणारा आणि दुसरा एक हात आशीर्वाद देण्यासाठी! चांगल्याला अभय देण्यासाठी सतत प्रोत्साहन देत असतो. म्हणूनच बाप्पा लहान-थोरांना आपलासा वाटतो. तो आपली गाऱ्हाणी ऐकतो; तसेच आपल्या प्रयत्नांना यशही देतो. विश्वाचा पालनहार असणारा गणपती याचे वाहन मूषक आहे...एक पिटुकला उंदीर! जो अंधारात राहतो, भित्रा प्राणी आहे, मात्र तितकाच चपळ आहे. उंदीर हे प्रतीक आहे, आपल्या मनाच्या तळाशी असलेल्या भयाचे, चंचल मनाचे! आपल्या मनात असणारी चंचलता, साशंकता, भित्रेपणा, वासना यावर जर नियंत्रण ठेवले, त्यावर आपण स्वार झालो, तर गणपती बाप्पाचे अगडबंब दिसणारे शरीरही हा मूषक ज्याप्रमाणे सावरू शकतो, नव्हे तो गतिमान करतो, त्याप्रमाणे आपल्या मर्यादांवर आपणच स्वार होऊन आपले आयुष्य प्रगतीकडे नेऊ शकतो.

बाप्पाला आवडणाऱ्या गोष्टींमध्ये जास्वंद किंवा लाल फूल हे आहे. लाल रंग हा सळसळत्या ऊर्जेचा, चैतन्याचे प्रतीक आहे. शास्त्रानुसार गणपतीचा वर्ण (रंग) शेंदरी किंवा रक्त वर्ण आहे, जो तेजाचे प्रतीक आहे. 'दूर्वा' ही निसर्गामध्ये सहज उपलब्ध असणारी वनस्पती आहे. बरेचदा जे आपल्याला सहज मिळते, त्याचे मोल आपणास कळत नाही. निसर्गाने आपल्याला हवा, पाणी, सूर्यप्रकाश हे विनामुल्य आणि भरपूर प्रमाणात दिले आहे, त्याचे मोल आपल्याला जाणवत नाही. म्हणूनच दुर्वा ही सहज उपलब्ध झालेल्या गोष्टींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचे प्रतीक आहे. सगळ्या प्रतिकांमधून आपल्याला संतुलित आयुष्याचा संदेश देणारा बाप्पा दरवर्षी येतो आणि निघूनही जातो. गणपतीचे 'विसर्जन' या मागेही आध्यात्मिक अर्थ गर्भता आहे. जे-जे प्रिय आहे, ज्याचा लळा लागला आहे, तीसुद्धा सहजपणे सोडता यायला हवी. इतकी निरामयता आपल्या ठायी येईल, तेव्हा ते 'विसर्जन'सुद्धा आपल्यासाठी एक सोहळा असेल आणि श्रीगणेश म्हणजे आपल्या लाडक्या बाप्पाचे विसर्जनसुद्धा कायम प्रेरणादायी ठरेल.

**(राज्यकर अधिकारी, जीएसटी भवन, वांद्रे.)**

समृद्धी अनगोळकर यांच्या घरातील श्री गणेशाची आकर्षक मूर्ती.

अजय भोसले यांच्या घरातील श्री गणरायाची सुबक मूर्ती.

कांबळी परिवार, मु.पो. पडवणे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग
यांच्या घरातील बाप्पाची मनमोहक मूर्ती.

विशाल परमार यांच्या घरातील श्री गणेशाची सुंदर मूर्ती.

युवराज सोरेगांवकर, कक्ष अधिकारी, बार्शी
यांच्या घरातील गौरीगणपती.

सोनलस्मित पाटील यांच्या घरातील श्री विनायकाची सुंदर मूर्ती.

मनस्वी गोंधळी यांच्या घरातील श्री गणेशाची आकर्षक मूर्ती.

स्वाती विचारे यांच्या घरातील श्री गणेशाची सुबक मूर्ती.

रोहिणी सकपाळ यांच्या घरातील श्री गणरायाची सुंदर मूर्ती.



कनिका खिरुडे जाधव, नाशिक यांच्या घरातील श्री मंगलमूर्ती.

दाभाडे यांच्या घरातील सिंहावर आरूढ झालेली
श्री गणरायाची विलोभनीय मूर्ती.

मेघा इथापे यांच्या घरातील श्री गणरायाची सुरेख मूर्ती.

पद्मजा पाठक यांच्या घरातील श्री मंगलमूर्ती.

योगिता चव्हाण यांच्या घरातील श्री गणेशाची आकर्षक मूर्ती.

संतोष तोडकर यांच्या घरी
विराजमान झालेली श्री गणेशाची आकर्षक मूर्ती.

शैलेश कदम (आर्टिस्ट, आपलं मंत्रालय) यांच्या घरी
विराजमान झालेली श्री गणरायाची मनमोहक मूर्ती.

गायत्री जाधव यांच्या घरातील श्री गणराया आणि
गौरी मातेची उभी असलेली सुरेख मूर्ती.

सारिका चौधरी यांच्या घरातील श्री गणेशाची विलोभनीय मूर्ती.

छाया गोताळ यांच्या घरातील श्री विघ्नेश्वराची मंगलमूर्ती.

बालाजी हराळ यांच्या घरातील श्री विनायकाची सुंदर मूर्ती.

# कविता

## विरक्तता

खोल अंतरंगात एक अंतराळ
अंधाऱ्या पोकळीतले ग्रह गोल स्तब्ध
बंध नाही - आकर्षण नाही-विकार विचार थंडथंड...
परिवहन नाही
परिभ्रमण नाही
सगळं अंतराळ थंडथंड.

असली विरक्तता,
रेशमाच्या किड्यासारखी-
बंदिस्त,
घुसमटलेली घामेघूम-नकोशी.

विरक्तता हवी...
बासरीच्या सुरांपासून
हुरहुरीच्या धुक्यापासून

विरक्तता हवी...
या थंड अंतराळापासून
तुझ्यापासून-माझ्यापासून

विरक्तता हवी...
भक्तीपासून-मुक्तीपासून
विरक्ततेपासूनही -
शुभ्र सात्त्विक विरक्तता....

**– विवेक दहिफळे,**
**('गृहपाठ' या काव्यसंग्रहातून)**

## क्षण...

क्षण
अपरिहार्य
सर्वस्व
असं
काही
नव्हतं
नसतं
आणि
नाही
एक
क्षण
होता
क्षणासारखा
क्षणात
मेला
इतकंच...

**– लिना संखे,**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

## एवढाच तू...

'मी' कोण आहे?
मी एक 'क्षण' आहे.
बस एवढाच 'मी',
बस एवढाच 'तू'...

कसला घेऊन बसला 'मी'
त्या आदिशक्तीच्या मर्जी एवढा तू,
अंतरंगाच्या गुंत्यात आता
फक्त शोध तुला तू...

पाहा आत अंतरंगात
तेवढाच 'तू' तेवढाच तू,
अंतरंगाच्या प्रतिबिंबा
एवढाच 'तू' एवढाच तू...

शोधता-शोधता ज्ञानामृत
अनंताशी तोल तुला तू,
तेव्हा त्याच्या स्वरूपाशी
हो एकताल तू,
हो एकताल तू...

**– अजय भोसले,**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

## काजळलेली वाट तरीही...

घरंगळणीची बरीच वाट
तुडवलेली तिनंही
त्याच गतीने जुळत गेलेल्या काही
मैत्रीच्या तारा, वैराचा उष्ण वारा,
कुठं नात्यांची पडझड,
कधी विणीच्या धारा
काही सहजीवनाचे यत्न
काही योगदानाचे यज्ञ
लडबडल्या जिवाला शोध
ऊर्ध्वमुखी ज्वाळेचा,
जमण्याच्या नाळेचा
काही झरे अतिनिवळ,
कसे कळावे त्यांना
दूषिताचे दुःख
तिला खेचत गेली
त्याची डागाळलेली कफनी,
नजरेत रुतलेली घसरणीची वेदना
अन् परतीच्या प्रवासाची उदास आस
समळं 'खरंखरं' वाटण्यापासून
'असं काही नसतं' पर्यंत पोहोचलेला संभ्रमाचा फास
तिच्याजवळ बुधलीभर तेल नि इवलीशी दिवटी
त्याच्याजवळ चिंध्यांचं बंडल
अन् कडू करंजाचं दांडकं, घरभर पसारा,
अंगणात कासऱ्याचा तिढा
भोवती-काजळासारखी घट्ट दाटलेली शंका
भरदुपारीही अंधारी आणून तोंडावर पाडणारा
भूतकाळाचा ओंडका
कर्तृत्वाच्या दारावर भयाच्या धडका
पोळलेल्या भात्यात पुन्हा प्राण भरून
त्याच्या डोळ्यांतली ठिणगी
तिनं ओठांवर धरली
तिच्या हृदयातली आग
त्यानं चुडाशी धरली
दाट अंधारात, हातात हात घेत,
पायताणावरची धूळ झटकली.
.. असं बळेच सकारात्मक सार
काढू पाहतं मन
वास्तवाच्या अंधाराशी
लढू पाहतं मन

**– अंजली ढमाळ,**
**राज्यकर उप आयुक्त तथा उपसंचालक, मराठी भाषा विभाग,**
**संपर्क क्र. ९७६२१०६६१७.**

## त्याग...

सावळी तनु राम जणू
ओढून प्रत्यंचा उभा असा,
जोडून हात सांगे हनुमंत
कथनात वेळ घालवू कसा...

रामप्रिय लक्ष्मण युद्धस्थळी
मूर्च्छित हा पडला असा,
जाऊ दे मज, भगवंत
उशीर आधीच झाला तसा...

लक्ष्मण मूर्च्छित ऐकोनी
भरताचा झाला कोरडा घसा,
सोडून सारे यावे वाटले
परी सोडवेना रामवसा...

उभे करोनी हनुमंतासी
गेला तसा, आला असा,
धूळ लावताच सौमित्रेचा
सुटून जाईल यमफासा...

धूळ बघुनी राघवाचा
जीव झाला कसानुसा,
ऊर्मिलेच्या शतजन्मांचा
होता तो त्यागवसा...

लावताच ती धूळ कपाळी
सौमित्र उठला तसा,
ऊर्मिलेच्या पुण्याईचा
कोरला जाई असा ठसा...

**– प्रवीण कुलकर्णी,**
**माहिती अधिकारी, मा. मुख्यमंत्री कार्यालय.**

# आपल्या स्मार्टफोनमधील एआय : खिशातील अदृश्य शक्ती!

प्रशांत वामन

मागच्या भागात आपण पाहिले की, जेव्हा एआयला रोबोटिक्सच्या माध्यमातून शरीर मिळते, तेव्हा ते भौतिक जगात कशी क्रांती घडवते; पण तुम्हाला माहिती आहे का? तुम्हाला एआयचा अनुभव घेण्यासाठी एखाद्या मोठ्या प्रयोगशाळेत किंवा फॅक्टरीमध्ये जाण्याची गरज नाही. तुमच्या हातातील जो 'स्मार्टफोन' आहे, तो आजच्या काळातील सर्वात प्रगत आणि फिरते एआय केंद्र आहे.

सकाळी अलार्म वाजल्यापासून ते रात्री झोपण्यापूर्वी सोशल मीडिया पाहण्यापर्यंत, आपण कळत–नकळत शेकडो वेळा एआयचा वापर करतो. पूर्वी जो संगणक एका मोठ्या खोलीइतका असायचा, त्यापेक्षा हजारपटीने जास्त बुद्धिमत्ता आज तुमच्या खिशातील एका छोट्या चिपमध्ये साठवलेली आहे. या सातव्या भागात आपण पाहणार आहोत की, आपला स्मार्टफोन खऱ्या अर्थाने 'स्मार्ट' कसा झाला आणि त्यात कोणती अदृश्य एआय शक्ती काम करत आहे.

## १. स्मार्टफोनमधील एआय चे हृदय : 'NPU' चिप

स्मार्टफोनमधील एआय समजून घेण्यासाठी आपल्याला त्याच्या इंजिनकडे पाहावे लागेल. पूर्वीच्या फोनमध्ये केवळ CPU (Central Processing Unit) असायचा; पण एआयच्या गुंतागुंतीच्या गणितांसाठी आता आधुनिक फोनमध्ये NPU (Neural Processing Unit) किंवा AI Engine नावाच्या विशेष चिप्स असतात.

ही चिप मानवी मेंदूच्या मज्जासंस्थेप्रमाणे काम करते. जेव्हा तुम्ही फोटो काढता किंवा व्हॉइस कमांड देता, तेव्हा ही चिप विजेच्या वेगाने प्रक्रिया करते. ॲपलची 'Bionic' चिप किंवा क्वालकॉमची 'Snapdragon' सिरीज या सर्व आज एआयमुळेच इतक्या शक्तिशाली झाल्या आहेत.

## २. फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफी: 'कंप्युटेशनल फोटोग्राफी'

आज आपण स्मार्टफोनने जे फोटो काढतो, ते केवळ भिंगाचा (Lens) कमाल नसून ती एआयची जादू आहे. याला 'कंप्युटेशनल फोटोग्राफी' म्हणतात.

**सीन रेकग्निशन :** जेव्हा तुम्ही कॅमेरा एखाद्या फुलाकडे किंवा अन्नाकडे नेतात, तेव्हा एआय ओळखते की, समोर काय आहे. ते आपोआप रंग, कॉन्ट्रास्ट आणि उजेड अशा प्रकारे समायोजित करते की, फोटो सुंदर दिसेल.

**पोर्ट्रेट मोड (Bokeh Effect) :** एकाच कॅमेऱ्याने बॅकग्राऊंड ब्लर (धूसर) करणे हे एआयमुळेच शक्य आहे. एआय फोटोमधील व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांच्यातील फरक ओळखते आणि अत्यंत अचूकपणे कडा (Edges) कापून बॅकग्राऊंडला धूसर करते.

**नाईट मोड :** कमी प्रकाशात फोटो काढताना एआय अनेक फोटो एकाच वेळी घेते आणि त्यातील सर्वोत्तम पिक्सेल्स निवडून एक स्पष्ट आणि उजळ फोटो तयार करते.

**एआय इमेज इरेजर :** गुगल पिक्सेल किंवा सॅमसंगच्या फोनमध्ये आपण फोटोमधील नको असलेली व्यक्ती किंवा वस्तू फक्त एका क्लिकवर गायब करू शकतो. त्या जागी काय असावे, याचा अंदाज एआय आधीच्या पिक्सेल्सवरून लावते.

## ३. व्हर्च्युअल असिस्टंट्स : तुमचे डिजिटल साहाय्यक

सिरी (Siri), गुगल असिस्टंट (Google Assistant) आणि अलेक्सा हे स्मार्टफोनमधील एआयचे सर्वात स्पष्ट चेहरा आहेत. हे केवळ 'व्हॉइस रेकग्निशन' (आवाज ओळखणे) करत नाहीत, तर ते 'नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग' (NLP) वापरून तुमच्या वाक्याचा संदर्भ समजून घेतात.

तुम्ही जेव्हा म्हणता, उद्या सकाळी सातचा अलार्म लाव, तेव्हा एआयला समजते की, 'उद्या' म्हणजे नेमकी कोणती तारीख आणि 'अलार्म' म्हणजे कोणते ॲप उघडायचे आहे. हे असिस्टंट रोजच्या वापरातून तुमचे उच्चार आणि तुमच्या सवयी शिकतात. ज्यामुळे काळानुसार ते अधिक अचूक होतात.

### ४. बॅटरी आणि परफॉर्मन्स व्यवस्थापन

तुमच्या फोनची बॅटरी दिवसभर का टिकते? यामागेही एआय काम करत असते. त्याला 'ॲडॉप्टिव्ह बॅटरी' (Adaptive Battery) म्हणतात.

एआय हे सतत निरीक्षण करते की, तुम्ही दिवसाच्या कोणत्या वेळी कोणते ॲप्स वापरता. समजा तुम्ही रात्री फेसबुक वापरत नसाल, तर एआय त्या ॲपला पूर्णपणे 'स्लीप मोड'मध्ये टाकते, जेणेकरून बॅटरी खर्च होणार नाही. तसेच फोन जास्त गरम होऊ नये म्हणून प्रोसेसरची गती कमी-जास्त करण्याचे कामही एआयच करते.

### ५. सुरक्षा : बायोमेट्रिक्स आणि फेस आयडी

तुमचा फोन तुमच्या चेहऱ्याने किंवा अंगठ्याने उघडणे (Unlock) ही एआयची एक मोठी देणगी आहे.

**फेस आयडी (FaceID)** : ॲपलचा फेस आयडी तुमच्या चेहऱ्यावर ३०,००० पेक्षा जास्त अदृश्य बिंदू (Dots) टाकतो आणि एक थ्रीडी नकाशा तयार करतो. तुम्ही चष्मा लावला, दाढी वाढवली किंवा अंधारात उभे असलात तरी एआय ओळखते की, हा तुमचाच चेहरा आहे. हे साध्या फोटोंनी फसवले जाऊ शकत नाही, कारण एआयला खोली (Depth) समजते.

**फिंगर प्रिंट :** स्कॅनरवरून अंगठा फिरवल्यावर त्यातील सूक्ष्म रेषांचे विश्लेषण एआय अल्गोरिदम करतात.

### ६. कीबोर्ड आणि संवाद : प्रेडिक्टिव्ह टेक्स्ट

आपण व्हॉट्सॲपवर टाईप करताना आपल्याला पुढचा शब्द सुचवला जातो, त्याला 'प्रेडिक्टिव्ह टेक्स्ट' म्हणतात. हे मशीन लर्निंगचे एक उत्तम उदाहरण आहे.

एआय तुमच्या टाईप करण्याच्या पद्धतीचा अभ्यास करते. तुम्ही तुमच्या मित्रांशी बोलताना कोणते शब्द वापरता, तुमचे व्याकरण कसे आहे, हे सर्व एआय शिकते. तसेच 'ऑटो-करेक्ट' फिचर तुमची स्पेलिंगमधील चूक सुधारते, जेणेकरून तुमचा संवाद अधिक वेगवान होतो.

### ७. सोशल मीडिया आणि ॲप्समधील अदृश्य हात

तुम्ही जेव्हा इंस्टाग्राम किंवा यु-ट्यूब उघडता, तेव्हा तुम्हाला जे व्हिडिओ दिसतात, ते रँडम नसतात. प्रत्येक युजरसाठी ते वेगळे असतात.

तुमच्या फोनमधील एआय तुमची आवड ओळखते. तुम्ही कोणत्या व्हिडिओवर किती वेळ थांबलात, तुम्ही काय सर्च केले, यावरून एआय तुमचे एक 'व्यक्तिमत्व प्रोफाइल' तयार करते. यामुळेच तुम्ही एकदा एखादी वस्तू सर्च केली की, सर्व ॲप्समध्ये तुम्हाला त्याच वस्तूच्या जाहिराती दिसू लागतात.

### ८. रिअल-टाइम ट्रान्सलेशन आणि शिक्षण

आधुनिक स्मार्टफोन्स आता परदेशी भाषांचे रिअल-टाइममध्ये भाषांतर करू शकतात. तुम्ही कॅमेरा एखाद्या परदेशी भाषेतील फलकाकडे नेल्यास, गुगल लेन्स (Google Lens) त्यातील अक्षरे ओळखून (OCR) तुमच्या भाषेत भाषांतर करून देते. हे प्रवासात अत्यंत उपयुक्त ठरते. तसेच गणिताचे अवघड प्रश्न स्कॅन केल्यावर एआय ते टप्प्याटप्प्याने सोडवून देते.

### ९. भविष्यातील स्मार्टफोन एआय : ऑन-डिव्हाइस एआय

आतापर्यंत बहुतांश एआय प्रक्रिया ही इंटरनेटद्वारे 'क्लाउड'वर व्हायची; पण आता 'ऑन-डिव्हाइस एआय'चे युग येत आहे. याचा अर्थ असा की, तुमचा फोन इंटरनेटशिवायही प्रगत निर्णय घेऊ शकेल. यामुळे तुमची माहिती अधिक सुरक्षित राहील आणि फोनची गती वाढेल. भविष्यात तुमचा फोन तुमचा 'पर्सनल कोच', 'डॉक्टर' किंवा 'सेक्रेटरी' म्हणून काम करेल, जो तुमच्या प्रत्येक गरजेचा आधीच अंदाज लावेल.

### निष्कर्ष

स्मार्टफोन हे आता केवळ संवादाचे साधन राहिलेले नाही, तर ते मानवी क्षमतेचे विस्तारक (Extension of Human Capability) झाले आहेत. आपल्या हातातील ही छोटीशी वस्तू एआयमुळे इतकी शक्तिशाली झाली आहे की, ती आपल्या विचारांची आणि कृतींची नक्कल करू शकते; पण हे सर्व करताना आपला डेटा किती सुरक्षित आहे? एआय आपल्यावर पाळत ठेवत आहे का? हे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे आहेत.

स्मार्टफोनमध्ये आपण वैयक्तिक पातळीवर एआय वापरतो; पण जेव्हा हेच तंत्रज्ञान पूर्ण जगाचा किंवा समाजाचा डेटा हाताळते, तेव्हा काय होते? इंटरनेटवर आपण जे सर्च करतो, त्यामागे कोणती शक्ती असते?

हे आपण पुढच्या भाग ८ : इंटरनेट सर्च आणि अल्गोरिदममधील एआय (AI in Search Algorithms) मध्ये सविस्तरपणे पाहणार आहोत.

**(कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन. मोबाइल क्र: ८९८३३४४३६७)**

# वाचाल तर वाचाल...

मोहन काळे

पूर्वी ज्ञान प्राप्त करण्यासाठी पुस्तकं वाचणं जरुरीचे आहे, हे ठासून सांगितले जायचे आणि त्याची माहिती वडीलधारी माणसं, शिक्षकमंडळी द्यायची आणि आम्ही लायब्ररीची वाट धरायचो. कित्येक तास ग्रंथालयात पुस्तकांच्या सोबतीत घालवलेत.

अलीकडे असं म्हणतात की, 'गुगल माहिती देते आणि पुस्तक ज्ञान देते. हे एकदम खरं! आपल्याला काही माहिती प्राप्त करून घ्यायचे, तर लगेचच लॅपटॉप किंवा मोबाइलवर सर्च करतो आणि तशी माहिती लगेच तुमच्या बोटावर मिळते; पण तुम्हाला ज्ञान मिळतं का? विचारा स्वतःला, तर उत्तर 'नाही' असं मिळतं. ज्ञान मिळवण्यासाठी पुस्तकं आहे. ते प्राप्त करून देण्यासाठी गुरुजन आहेत. शाळा आहे, कॉलेज आहे, ग्रंथालय आहे. सगळं जर गुगलवर मिळाले, तर ज्ञान घेण्यासाठी शाळा नि कॉलेजची आवश्यकता का भासावी. भरमसाठ फी देणं, शाळा कॉलेजला जाणं येणं असेल नि गुरुजनांशी संवाद याची तर त्याची गरज भासणार नाही.

आपण वर्षभरात किती पुस्तकं विकत घेतली तर फार समाधानकारक उत्तर नाही किंवा वर्षभरात महिन्यात, आठवड्यात किंवा दिवसभरातील किती वेळ आपण स्वतःच्या वाचनासाठी दिला, तर पुन्हा उत्तर नकारार्थी असतं. अर्थात त्यालाही काही अपवाद आहे. पुस्तक वाचलं का तर त्याचं सोपं उत्तर म्हणजे वेळ नाही असं आपण देतो. काही मंडळी रोज वेगवेगळ्या विषयांवर वाचन करीत असतात.

आपलं जीवनमान खूप वेगवान झालंय, असं आपण रोज म्हणतो आणि सोबत चवीला वेळ नाही, अशी गोड तक्रार आपण करतो; पण वाचनासाठी वेळ जरूर काढू शकतो आपण. काही देशात तर एका ठराविक वेळी घरातील सर्वजण पुस्तकं वाचण्यासाठी वेळ राखीव ठेवतात. तो त्यांच्या जगण्याचा भाग झाला आहे. वाचनाची सवय लागली की, आवड निर्माण होईल आणि आपल्या ज्ञानात आपसूक भर पडेल, त्यासाठी कुठे जायची गरज नाही.

गुगलचा वापर रोजच्या जगण्यात अपरिहार्य झालाय हे नक्कीच, तो कराच. अगदी अनोळखी रस्त्याने इच्छित स्थळी जाण्यासाठी योग्य माहिती गुगल मॅप पुरवतो. वाचनाने तुमचे लक्ष, स्मरणशक्ती आणि संवादकौशल्य सुधारते. तसेच तणाव कमी करू शकते, मानसिक आरोग्य सुधारते आणि तुमच्या रोजच्या जगण्यात, कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी मदत मिळते. ज्ञान मिळवण्यासाठी 'पुस्तक' हा जगण्याचा भाग बनवा. ते नक्कीच सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे आणि अफाट ज्ञान प्राप्तीचे स्रोत आहे.

आपल्याला माहीत आहे की, आपल्या देशाचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम साहेबांचा जन्मदिन १५ ऑक्टोबर 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. शाळा, कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकं सोडून अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी, हा उद्देश त्या मागे आहे; पण एक दिवस वाचन प्रेरणा दिन साजरा करीत असताना तो वर्षभर प्रत्येकाने अमलात आणला, तर ते अधिक उपयुक्त होईल असं वाटतं.

प्रत्येकाच्या घरात कपडे, पैसे, दागिने ठेवण्यासाठी एक तरी कपाट असतंच. तसंच एक पुस्तकांचं कपाटही हवं; कपाटासाठी घरात जागा नसेल, तर शोकेस म्हणून एखादा कप्पा तर असतोच. तुमच्या आवडीची छान-छान पुस्तकं वाचून तिथे ठेवा. ती पुन:पुन्हा वाचा. मुलांना वाचायला द्या.

कधी-कधी वाटतं की, कपाटातल्या पुस्तकांची पानं वाचन दिनी नटून बसतात आपल्यासमोर एक दिवस. तुमच्या पुस्तकांचा संग्रह पाहून तुमच्या घरी आलेले पाहुणे नक्कीच दाद देतील. अर्थात त्यांनी दाद द्यावी म्हणून तुम्ही ते करू नका. तुम्हीच स्वतःच स्वतःला दाद द्याल हे नक्कीच.

आपण ठराविक दिवसांनी आवडणारी पुस्तके खरेदी करू या आणि वाचनासाठी आवर्जून खास वेळ काढू या! तुम्ही तुमचा अमूल्य वेळ कधी देणार पुस्तकासाठी?

**(साहाय्यक प्रशासकीय अधिकारी (निवृत्त), अणू ऊर्जा विभाग, भारत सरकार. मोबाइल क्र.: ९१३७९३५१४३.)**

# कढी सुरक्षा

**योगेश मोरे**

मंत्रालयाची सुरक्षा म्हटले की, महाराष्ट्र पोलीस दलाचे दक्ष जवान, प्रवेशद्वारांवरील काटेकोर तपासणी, बॅग स्कॅनिंग आणि सुरक्षिततेसाठी करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना डोळ्यासमोर येतात. मात्र, मंत्रालयाच्या परिसरात वर्षानुवर्षे जपली गेलेली आणखी एक अनोखी परंपरा आहे. ती म्हणजे मंत्रालयाच्या उपाहारगृहातील प्रसिद्ध दह्याची कढी.

ही सुरक्षा एखाद्या गोपनीय दस्तऐवजाची नसून, एका वैशिष्ट्यपूर्ण पाककृतीच्या चवीची आणि गुणवत्तेची आहे. मंत्रालयातील उपाहारगृह आणि चौरस आहार केंद्र येथे मिळणारी कढी हा केवळ खाद्यपदार्थ नसून, अनेक अधिकारी, कर्मचारी आणि मंत्रालयात येणाऱ्या असंख्य अभ्यागतांच्या आठवणींचा अविभाज्य भाग आहे. कढीचा रंग, सुगंध, चव आणि गुणवत्तेतील सातत्य यामुळे या पदार्थाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

मंत्रालयाच्या उपाहारगृहात वर्षानुवर्षे विविध खाद्यपदार्थ उपलब्ध होत आले आहेत. या कालावधीत शासनव्यवस्थेत बदल झाले, अधिकारी–कर्मचारी बदलले, उपाहारगृहातील मेन्यू आणि पदार्थांच्या किमतींमध्येही बदल झाले. मात्र, या सर्व बदलांमध्ये कढीची चव आणि तिच्याशी जोडलेल्या आठवणी कायम राहिल्या आहेत. ज्या दिवशी मेन्यूमध्ये कढीचा समावेश असतो, त्या दिवशी उपाहारगृहात नेहमीपेक्षा अधिक गर्दी दिसून येते. अनेक जण विशेषतः कढीचा आस्वाद घेण्यासाठी आपल्या जेवणाची वेळ ठरवतात. त्यामुळे या कढीला लाभलेली लोकप्रियता तिच्या वैशिष्ट्यपूर्ण चवीची साक्ष देते.

उपाहारगृहात कढी उपलब्ध असलेल्या दिवशी वातावरणात विशेष उत्साह जाणवतो. जेवणाच्या रांगेत उभे असलेले अनेक जण आवर्जून विचारतात, 'आज कढी आहे ना?' या प्रश्नाला होकारार्थी उत्तर मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर समाधान उमटते. काही जण तर विशेषतः कढीचा आस्वाद घेण्यासाठी उपाहारगृहात येतात. या कढीचे वैशिष्ट्य तिच्या चवीतील समतोलपणात आहे. आंबटपणा आणि गोडवा यांचे योग्य प्रमाण, सुगंधी फोडणी, योग्य घट्टपणा आणि घरगुती चवीचा अनुभव यामुळे ती अनेकांच्या पसंतीस उतरली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, अनेक वर्षांनंतरही या कढीची चव तितकीच परिचित आणि आपलेपणाची वाटते.

एखाद्या खाद्यपदार्थाची चव वर्षानुवर्षे सातत्यपूर्ण कशी राहू शकते, हा प्रश्न स्वाभाविकपणे पडतो. त्यामागे घटकपदार्थांचे अचूक प्रमाण, मसाल्यांचा समतोल, दह्याचा योग्य वापर आणि तयार करण्याच्या पद्धतीतील सातत्य यांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. यासोबतच अनुभवी आचारी आणि कर्मचाऱ्यांचे कौशल्य, गुणवत्तेबाबतची जागरूकता आणि कामातील सातत्य यामुळे ही चव टिकून राहण्यास मदत होते. यालाच गमतीने 'मंत्रालयाची कढी सुरक्षा' असे म्हणता येईल. ज्या प्रकारे मंत्रालयाची सुरक्षा व्यवस्था प्रशासकीय कामकाजाच्या सुरक्षिततेसाठी कार्यरत असते, त्याचप्रमाणे कढीची चव, गुणवत्ता आणि परंपरा जपणारे आचारी व कर्मचारी या अनोख्या 'चव सुरक्षा व्यवस्थे'चा भाग आहेत.

मंत्रालयातील अनेक सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या आठवणींमध्ये उपाहारगृहातील कढीला विशेष स्थान आहे. काही परंपरा लिखित स्वरूपात नोंदविलेल्या नसतात; त्या अनुभवातून आणि आठवणींतून पुढे जपल्या जातात. मंत्रालयातील दह्याची कढी ही अशाच जिव्हाळ्याच्या परंपरांपैकी एक आहे. ज्यांनी मंत्रालयाच्या उपाहारगृहात जेवण केले आहे, त्यांना या कढीची स्वतंत्र ओळख करून देण्याची आवश्यकता भासत नाही.

## परंपरेसोबत बदलते खाद्यसंस्कृती

मंत्रालयाच्या उपाहारगृहातील कढीची परंपरा जपली जात असतानाच, खाद्यपदार्थांमध्ये वैविध्य आणि नावीन्य आणण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न करण्यात येत आहेत. पदार्थांमध्ये तोचतोचपणा टाळून मिलेट्स, पोषक आहार आणि विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचा समावेश करण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे उपाहारगृहाच्या खाद्यसेवेत वैविध्य निर्माण होण्यास मदत झाली आहे.

नाश्ता आणि जेवणाच्या वेळेत उपाहारगृहात वाढत जाणारी गर्दी ही या खाद्यसेवेबद्दलच्या पसंतीचे द्योतक आहे. मंत्रालयात येणारे अधिकारी, कर्मचारी, विविध कामांसाठी येणारे नागरिक; तसेच इतर अभ्यागत यांच्यासाठी उपाहारगृह हे दैनंदिन जीवनातील एक महत्त्वाचे ठिकाण आहे. या उपाहारगृहातील कढी आणि मसालेभात यांसारखे पदार्थ अनेकांना आकर्षित करतात. गरमागरम कढीचा आस्वाद घेताना अनेकांना घरगुती जेवणाची आठवण होते. त्यामुळे या पदार्थांची चव केवळ भोजनाचा अनुभव न राहता, अनेकांच्या वैयक्तिक आठवणींचा भाग बनते.

## चव जपणारे खरे 'सुरक्षा रक्षक'

या कढीची पाककृती इतक्या वर्षांपासून सातत्याने कशी जपली गेली? तिच्या घटकपदार्थांचे प्रमाण कोणी सांभाळले? चवीतील सातत्य कसे राखले गेले? या प्रश्नांची उत्तरे शोधताना उपाहारगृहातील अनुभवी आचारी आणि कर्मचारी यांचे योगदान अधोरेखित करावे लागते. एखाद्या खाद्यपदार्थाची ओळख केवळ त्याच्या पाककृतीमुळे निर्माण होत नाही, तर ती पाककृती मनापासून आणि कौशल्याने साकारणाऱ्या हातांमुळेही निर्माण होते. मंत्रालयाच्या कढीची चव जपण्यात या आचारी आणि कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे या चविष्ट परंपरेचे खरे 'सुरक्षारक्षक' म्हणून त्यांच्याकडे पाहता येईल.

शासकीय कामकाजात निर्णय, नियम आणि आदेश यांना महत्त्व असते. मात्र, मंत्रालयाच्या उपाहारगृहातील कढीने कोणत्याही औपचारिक आदेशाशिवाय अनेकांच्या मनात आपले स्थान निर्माण केले आहे. मंत्रालयाची ओळख केवळ प्रशासकीय इमारत, कार्यालयीन व्यवस्था किंवा सुरक्षा यापुरती मर्यादित नाही. त्या ओळखीला समृद्ध करणाऱ्या अनेक छोट्या-छोट्या परंपरा आणि आठवणीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. त्यामध्ये मंत्रालयाच्या दह्याच्या कढीचा उल्लेख निश्चितच करता येईल.

मंत्रालयातील अधिकारी-कर्मचारी यांच्या अनेक वर्षांच्या चवीच्या आठवणींचा हा पदार्थ अविभाज्य भाग बनला आहे. कार्यालयीन कामकाजात विविध विषयांवर मतभेद असू शकतात; मात्र, मंत्रालयातील कढीच्या चवीबाबत अनेकांचे एकमत दिसून येते. या कढीची लोकप्रियता कोणत्याही जाहिरातीवर आधारित नसून, सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि चवीच्या अनुभवातून निर्माण झाली आहे.

## चव जपणाऱ्या हातांप्रति कृतज्ञता

मंत्रालयाच्या सुरक्षेवर अनेक लेख लिहिले जातील. मात्र, मंत्रालयाच्या 'कढी सुरक्षे'ची ही वैशिष्ट्यपूर्ण परंपरा जपणाऱ्या आचारी आणि कर्मचाऱ्यांच्या योगदानाची नोंद घेणेही तितकेच आवश्यक आहे.

दरवर्षी मंत्रालयात अनेक अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त होतात, तर काही नव्याने सेवेत रूजू होतात. विविध कामांसाठी मंत्रालयात येणारे नागरिक आणि अभ्यागत यांच्यापैकी अनेकांच्या आठवणींमध्ये उपाहारगृहातील कढी आणि मसालेभात यांसारख्या पदार्थांना विशेष स्थान मिळालेले आहे.

या चवीच्या परंपरेचे जतन करणाऱ्या सर्व आचारी आणि कर्मचाऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करावीशी वाटते. त्यांच्या कौशल्यामुळे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या पदार्थांची गुणवत्ता आणि ओळख टिकून राहण्यास मदत झाली आहे.

मंत्रालयाच्या उपाहारगृहातील खाद्यपरंपरा, तेथील कर्मचारी आणि त्यांच्या योगदानाची दखल घेण्याची संधी या निमित्ताने मिळाली.

मंत्रालयाची ओळख ही केवळ प्रशासकीय कामकाज आणि सुरक्षा व्यवस्थेपुरती मर्यादित नाही. येथे जपल्या जाणाऱ्या मानवी नात्यांच्या, आठवणींच्या आणि विविध परंपरांच्या माध्यमातूनही ती समृद्ध होत असते. मंत्रालयाच्या उपाहारगृहातील दह्याची कढी ही याच जिव्हाळ्याच्या परंपरेचे एक स्वादिष्ट उदाहरण आहे.

कढीच्या निमित्ताने मंत्रालयाच्या उपाहारगृहातील खाद्यपदार्थांचा आस्वाद घेणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी आणि अभ्यागतांच्या वतीने चव जपणाऱ्या आचारी व कर्मचाऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करता आली, याचे विशेष समाधान वाटते.

(उपसंपादक, महाराष्ट्र शासन.)

# जिंदगी और कुछ भी नही... तेरी मेरी कहानी है...

**प्रवीण टाके**

आपल्या अवतीभोवती असणारी, नात्याने ग्रहासारखी कक्षेत फिरणारी, सण, उत्सवाला, तोरणात, मरणात नियमित भेटणारी माणसे, साधारणतः आपले जग असते. तरीही या कोषात जगताना, परग्रहावरील अनामिक एलियनसारखे आपल्याला कुणाचे वेड का असावे? ज्यांच्यासोबत आयुष्य जगतोय त्यांना सोडून मनात कुणाच्या तरी भेटीची ओढ, अनामिक हुरहुर का असावी? हळूच पहाटे जाग आल्यावर, कधीकधी रात्री उशिरा चांदण्यांनी डोळ्यांत गर्दी केल्यावर आपलं मन हळूच हळवं का व्हावं? बर्डीच्या बाजारात, इरवीन चौकात, मॉलच्या विंडोशॉपिंगमध्ये, मोहरमच्या गर्दीत, बहिरमच्या यात्रेत, रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर, लोकलच्या गर्दीत, विमानतळावर, अगदी विदेशात, दुसऱ्या समूहाच्या लग्नात, अनोळखी चेहऱ्यांमध्ये हरवल्यावर डोळ्यांना कुणाचा शोध का असावा?

***समोर मृत्यू उभा तरीही***
***नसे तुझे वेड सोडिले मी***
***तुझीच गाणी अजून असती***
***थरारणाऱ्या स्वरात माझ्या***

...अशी आपली अवस्था का व्हावी? अपूर्णतेचा अख्खा बाजार आपल्याच आयुष्यात का मांडला जावा? अनेक लोकांशी आपली नावं जोडली गेल्यानंतरही मनात मात्र एक घर खालीच का राहावं? मानवी संबंध, भावनांचा कल्लोळ, जिव्हाळा, प्रेम, मैत्री, आसक्ती, अशा किचकट विषयांवर पीएच.डी. केल्यानंतरही चौथीतल्या प्रश्नासारखा *तुम होती तो ऐसा होता...* हा प्रश्न का अनुत्तरित राहावा? रसायनशास्त्राच्या रंग बदलण्याच्या सूत्रांचा मुखपाठ अभ्यास असणारे आपण... *ॲक्शन ॲण्ड रिएक्शन आर इक्वल ॲण्ड अपोझिट* हा न्यूटनचा नियम जाणणारे आपण, चांद्रयान, मंगलयानावर खगोलशास्त्रज्ञासारखे बोलणारे आपण, अनेकांच्या आयुष्यातले गुंते लीलया सोडवणारे आपण... या हुरहुरीच्या प्रश्नावर मात्र भरकटलेले सॅटेलाइट का होतो? कालपर्यंत हसत-खेळत असणारा माणूस अचानक असा कोपऱ्यात जाऊन भीड़ में भी तनहा का होतो? साऱ्याच विषयांतील पारंगत आपण; पण का आयुष्य आपलं गहाण राहतं एका साध्या कोड्यात? अतृप्तता, अपूर्णता, अस्वस्थता का टोचत राहते टायरमध्ये घुसलेल्या खिळ्यासारखी? बुटाच्या सोलमधल्या अदृश्य काट्यासारखी?

*कब्र में पैर लटका है मामू! और फिर भी याद उसी को कर रहे हो...* असा समवयस्क दोस्त आपली फिरकी का घेत राहतो? सोडा ना! मुलांची लग्न व्हायला आली, मुलगी लग्न करून दुसऱ्या घरी गेली तरी तुमचं सुरूच... अशी बायको, नवरा सतत ओरडत का राहतात...

ही कुठली मेंदूची रचना आहे? ही कुठली अस्वस्थता आहे? या आपल्या रात्री इतक्या जीवघेण्या, इतक्या बेचैन का आहेत? हा दम नेमका का घुटतो आहे? आपण नेमके का घुटमळतो आहे? हा जीवघेणा नेमका कोणता केमिकल लोचा आहे?

परवा मात्र आयुष्यभराच्या कोड्याला प्रसिद्ध गीतकार संतोष आनंद यांनी लिहिलेल्या या एका गीताने अलगद सोडवले. मनाला शांती दिली. आयुष्याला उभारी दिली. उत्तर अगदी संक्षिप्त, थोडक्यात आहे... त्याच्या, तिच्यासोबत जगलास ना! ते जगून घेण्याचे दोन क्षणच तुझं खरं आयुष्य होतं... ती जी तुझी - माझी समाधी लागली होती ना! अरे तेच तर जीवन होतं. बाकी जगणं म्हणजे सगळा व्यवहार आहे, जन्म आणि मृत्यू यांच्या मधले अंतर पार करणं आहे.

गेली कित्येक वर्षे आपण हे गाणं ऐकतोय... 'शोर' चित्रपटातील लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी दिलेलं सुरेल संगीत आणि आयुष्याच्या गुंत्याला अलगद सोडविणारे ख्यातनाम कवी संतोष आनंद यांचे बोल... जगण्याचे मर्म दोन ओळीत. अवघ्या आठ शब्दांत... *दो पल के जीवन से, एक उम्र चुरानी है... सही में. जिंदगी और क्या है... तेरी मेरी कहानी है...*

***कुछ पाकर खोना है***
***कुछ खोकर पाना है***
***जीवन का मतलब तो***
***आना और जाना है***
***दो पल के जीवन से***
***इक उम्र चुरानी है***
***ज़िंदगी और कुछ भी नहीं***
***तेरी मेरी कहानी है....***

**(उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र शासन.)**

# नाटकाचे प्रेक्षक

**अजय भोसले**

नाटक पाहण्यासाठी तीन प्रकारची माणसे येतात. नाटकाचा आनंद लुटण्यासाठी आलेली, आपणास नाटकाची किती आवड आहे व आपण किती अभिरुचीसंपन्न आहोत, हे दाखवण्यासाठी आलेली, वेळ घालवण्यासाठी आलेली व फुकटे.

यातील पहिला प्रकार, पूर्णपणे रंगमंचाच्या अवकाशात तादात्म्य पावलेला असतो. इतरांच्या दृष्टीने एक कामातून गेलेला जो माणूस असतो तो हा...

दुसरा प्रकार, आम्ही किती नाटकवेडे आहोत, हे एखाद्यास सारखे सांगत असतात. तसेच ते अभिरुचीसंपन्न असल्यामुळे सभागृहात इतर प्रेक्षकांना त्रास होऊ नये, म्हणून कुजबुजत्या आवाजात सौजन्य राखून मोबाइलवर अविरत माहिती देण्याचे कार्य ठरावीक अंतराच्या कालावधीनंतर करत असतात.

तिसरा प्रकार, फार चुळबुळ करत असतो. आज नाटकगृहात तरुण प्रेक्षकांची फार वानवा असते. सर्वात त्रासदायक म्हणजे फुकटे. मामा वरेरकरांपासून यांच्यावर अद्याप उपाय शोधता आलेला नाही. यांची मान डावीकडून उजवीकडे आणि उलट, एक विशिष्ट झटका देत ठरावीक काळाने त्रिभुवन संचार करत असते. हे कोणत्याही वेळेला येऊ शकतात. हे अपरिहार्य आणि इमानी प्रेक्षक असतात.

नाटकाला येणारा प्रेक्षक सर्वसाधारणतः सुशिक्षित, अभिरुची संपन्न असतो. असे असतानाही नाटक सुरू होण्यापूर्वी शांतता राखा, मोबाइल बंद करा, असे आवाहन प्रत्येक प्रयोगादरम्यान करावे लागतेच. त्यातून काही विनोदाचे प्रसंगही निर्माण होतात. 'प्रपोझल' या नाटकादरम्यान, नाटकाचा नायक खूप कळकळीने शांतता राखण्याचे आवाहन करत असताना त्याच्याकडून अनवधानाने आपले मोबाइल व लहान मुले बंद करून बॅगेत ठेवावेत असे वाक्य उच्चारले गेले. प्रेक्षक या विधानावर हसले व नायकाची कळकळ बॅगेत ठेवून विसावले. काही वेळाच्या अंतराने चिकनी चमेली, कोंबडी पळाली, अशा रिंगटोनबरोबरच काही आध्यात्मिक रिंगटोनही, नायकाची कळकळ बॅगेत ठेवून नाटकाला प्ले बॅक संगीत देण्याचा प्रयत्न निष्पाप बुद्धीने करू लागल्या. नायक काय करणार? नाटक सुरू असताना तिथून उडी तर मारू शकत नाही.

दुसरा प्रसंग 'समुद्र' नाटकादरम्यानचा आठवतो आहे. एक आजीबाई, त्यांची मुलगी बाजूला बसल्या होत्या. इतरांना त्रास होऊ नये, या उदात्त भावनेने मुखबंद भावमुद्रेत वेफरचे चर्वण चालले होते. तरुणवर्ग जवळ-जवळ नव्हताच. डोळ्यात काहीतरी गेल्यामुळे डोळ्यातून पाणी येत होते. आजीबाई नाटक बघायचं सोडून माझंच निरीक्षण करू लागल्या, तेही कानाजवळ वेफरची सौम्य कुरकुर करत. खूप अवघडल्यासारखं झालं. आता ही आजी खांद्यावर डोकं घेऊन थोपटतेय की काय, अशी भीती वाटू लागली. मी एक नाराजीचा कटाक्ष फेकला; परंतु परिपक्व आजीवर त्याचा काही परिणाम झाला नाही.

नाटक सुरू होण्यापूर्वी, मध्यंतरात कलाकारांना भेटू नये, अशी विनंती केलेली असते. त्या विनंतीचा मान राखत काही प्रेक्षक आपल्यासाठी नाही ते, आपण भेटू शकतो असे म्हणत, भेटणे हे परम कर्तव्य असल्यासारखी पूर्तता करतातच. कलावंतांचा हा व्यवसाय आहे, काम आहे. ते नाटकाच्या पुढच्या भागाच्या तयारीत व्यग्र असतील, त्यांच्या कामात व्यत्यय नको हे किमान भान का राखल जात नाही?

नाटकादरम्यान असे आनंदाचा भंग करणारे प्रसंग घडत असतात आणि नाटकाचा आनंद लुटायला आलेला प्रेक्षक खट्टू होतो. याबाबत अधिक विस्ताराने लिहून काही साध्य होणार नाही. काही चमत्कार घडेल अशी आशा करू या. सुज्ञास अजून काय सांगावे!

**(अवर सचिव, महाराष्ट्र शासन.)**

# ‘कादंबरी’ (भाग–१)

**अरविंद शेटे**

कादंबरी आणि माझ्या वयात तसं फारसं अंतर नाही. असलंच तर जेमतेम ४–५ वर्षांचं. कादंबरी खूप गोड स्वभावाची, आमच्या चाळीतल्या सर्वांच्याच घरात तिचा संचार असायचा. सर्वांना कादंबरीचा खूप लळा होता. चाळीत कुणाच्या घरात काही कार्यक्रम असला तर, कादंबरीचा उत्साह इतका असायचा की, ती जणू त्या घरातील असल्यासारखीच भासायची. आमच्या लहानपणी एक बरं होतं. मुलं–मुली एकत्र खेळ खेळायचे. भातुकली, आठ चल्लस, टिक्कर पाणी, फुगड्या हे खेळ मुलींचे आणि लगोरी, आबाधूबी, गोट्या, आट्या–पाट्या हे खेळ मुलांचे अशी जरी विभागणी असली, तरी लपाछपी, लंगडी, करटी पाणी, रिंगण–रिंगण, डोंगर की पाणी, हे काही खेळ कॉमन असायचे. त्यामुळे आम्ही मुलं– मुलीही बरेचदा एकत्र खेळायचो.

कादंबरीची घरची परिस्थिती तशी बेताचीच होती. वडील लाकडाच्या एका छोट्या कारखान्यात कामाला होते. पुढे तो कारखाना बंद झाला आणि कादंबरीचे बाबा बेरोजगार झाले. आई धुणी–भांडी करून तीन मुलांचं शिक्षण आणि घर चालवू लागली. बेरोजगारीमुळे आलेल्या तणावाने कादंबरीच्या वडिलांना अचानक एक दिवस अर्धांगवायूचा झटका आला आणि त्यांच्या शरीराची डावी बाजू कायमची निकामी झाली. कादंबरीच्या घरातील अडचणीत आणखीनच भर पडली. या सर्व कारणांमुळे कादंबरीला शिक्षण अर्धवट सोडावं लागलं. आईच्या हाताला हात देऊन घराला हातभार लावावा लागला. दोन्ही भाऊ लहान असल्याने, कामाची जबाबदारी कादंबरीलाच स्वीकारावी लागली.

माझी शाळा पूर्ण होऊन मी कॉलेजात जाऊ लागलो होतो. कादंबरी दिसायला रंगाने सावळी असली, तरी खूप सुंदर होती. कादंबरी जबाबदारीच्या ओझ्याखाली असली तरी ती सगळ्यांशी हसून खेळून राहत असे. घरची परिस्थिती किंवा स्वतःच्या अडचणींचा तिने कधी बाऊ केला नाही. उलट जबाबदारीच्या ओझ्याने ती खूपच समंजस व प्रगल्भ झाली होती. पुढे एक दिवस कानावर बातमी आली, कादंबरीचं लग्न ठरलंय, नवरा मुलगा रायगडचा आहे. रायगडच्या एमआयडीसीमध्ये एका कारखान्यात काम करतो. मुलगा निर्व्यसनी आहे. आमच्याबरोबर लहानाची मोठी झालेल्या सर्वांमध्ये पहिले लग्न झालं ते कादंबरीचं. लग्नाला मी आमच्या घरातल्यांसोबत रायगडला गेलो होतो. कादंबरीला

बोहल्यावर चढताना पाहून तिच्यासोबत लहानपणी खेळलेले खेळ, घालवलेले आनंदाचे क्षण आठवत होतो. मंगलाष्टकं संपली आणि शेवटचे *कूर्यात सदा मंगलम सावधान* असे म्हणून लोकांनी टाळ्या वाजवल्या, तेव्हा मी भानावर आलो आणि हातातल्या सर्व अक्षता मी कादंबरीवर टाकल्या. पुढे सर्व लग्नविधी पार पाडल्यानंतर आम्हा मुंबईच्या वऱ्हाडींना परत निघायचं होतं, म्हणून आम्ही कादंबरीचा निरोप घ्यायला गेलो. साहजिकच कादंबरीचे डोळे भरून आले होते. तिच्या डोळ्यात केवळ अश्रू नव्हते. आपली मैत्री एका क्षणात कायमची दूर होतेय, याची भावना प्रकर्षाने तिच्या डोळ्यात दिसत होती. त्या काळी आतासारखे मोबाइल फोन नव्हते की, घरोघरी टेलीफोनही नव्हते. त्यामुळे आता संपर्क, संवाद हा जवळजवळ संपल्यासारखाच होता. त्याच जड अंतःकरणाने निरोप घेतला आणि मुंबईला निघण्यासाठी मार्गस्थ झालो.

कॉलेज संपले, नोकरीला लागलो. कादंबरीही तिच्या संसारात छान रमली होती. सगळं कसं छान सुरू असताना एक दिवस अचानक सकाळी बातमी आली. कादंबरीच्या नवऱ्याचा कारखान्यात काम करत असताना अपघात झालाय, गंभीर दुखापत झालीय. त्याला उपचारासाठी मुंबईला आणणार आहेत. बातमी ऐकूनच आम्ही सगळे हबकून गेलो. त्याच दिवशी संध्याकाळी कादंबरीच्या नवऱ्याला केईएम हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्याचे समजलं. दुसऱ्या दिवशी केईएम हॉस्पिटलमध्ये त्यांना पाहायला गेलो. त्यांची तब्येत खूप गंभीर होती. कादंबरी जवळच बसली होती. मला पाहताच ती उठली आणि अक्षरशः रडू लागली. मीही पुरता भांबावून गेलो. तिला धीर दिला. तीही थोडी सावरली. होईल सर्व ठीक. काही काळजी करू नकोस, असे धीराचे दोन शब्द बोललो आणि म्हटलं खर्चाची चिंता करू नकोस. काही लागलं तर हक्काने सांग. तिने माझ्याकडे पाहिलं. फक्त मान हलवली आणि तिला पुन्हा मोठा हुंदका आला. मी तिथून निघालो खरा; पण मनाने मात्र कादंबरीजवळच होतो. प्रारब्ध, नियती, भोग या सर्वांचा बळी कादंबरीच का? असा प्रश्न स्वतःला आणि देवाला करत होतो. पंधरा दिवस होऊन गेले तरी कादंबरीच्या नवऱ्याच्या प्रकृतीत म्हणावे तशी सुधारणा होत नव्हती. दिवाळीचा सण जवळ आला होता. सगळेजण आपापल्या आनंदात होते. दिवाळी सणातील एक महत्त्वाचा दिवस म्हणजे पाडवा.

पाडव्याचा दिवस उजाडला आणि कानावर पुन्हा वाईट बातमी आली. कादंबरीचा नवरा गेला. नियतीने पुन्हा एकदा कादंबरीवर आघात केला होता. ज्या पाडव्याच्या दिवशी बायको नवऱ्याच्या दीर्घायुष्यासाठी आनंदाने औक्षण करते, त्याच दिवशी कादंबरीला तिच्या नवऱ्याचं शेवटचे औक्षण करायची वेळ आली होती. काय बोलावं, काय करावं, काहीच सुचत नव्हतं. कादंबरीच्या नवऱ्याचे शव घरी आणलं गेलं.

तिच्या नवऱ्याच्या अंतिम प्रवासाची तयारी सुरू होती, इकडे कादंबरी रडत होती, हंबरडा फोडत होती. कादंबरीच्या रडण्याचा आवाज मन हेलावून टाकत होता. कादंबरीच्या नवऱ्याचं पार्थिव लोकांनी खांद्यावर घेतलं होतं आणि कादंबरीच्या नवऱ्याचा अंतिम प्रवास सुरू झाला होता. प्रेतयात्रेसोबत स्मशानभूमीत जाण्याचा मला काही धीर झाला नाही. आपल्यासोबत लहानाची मोठी झालेली कादंबरी, आपल्या लहानपणाची मैत्रीण, तिच्यावर आलेले दुःख, संकट हे तिच्या वयाचे आम्ही मित्रमैत्रिणी पहिल्यांदाच पाहत होतो. या अशा अत्यंत अप्रिय प्रसंगाला सामोरं जावं लागणारी कादंबरी ही आमच्यातील पहिलीच. त्यामुळे आम्ही तिला काय आधार देणार आणि काय समजवणार? वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी तिला वैधव्य आलं होतं. तिचं सांत्वन कसं करावं, हे आम्हा कोणाला काहीच समजत नव्हतं की, उमगत नव्हतं. काळ पुढे सरकत चालला होता. कादंबरी हळूहळू सावरू लागली होती. आमच्या इथेच मुंबईत ती तिच्या भावासोबत राहू लागली. तिथेच एका छोट्या इंडस्ट्रीमध्ये कामाला जाऊ लागली; पण तिचं लाजणं, हसणं मात्र कुठल्या कुठे विरून गेलं होतं. दिवसांमागून दिवस जात राहिले आणि एक दिवस, मी आणि माझा मित्र रमेश, माहिमला सिटी साईट टॉकीजला टायटॅनिक हा चित्रपट पाहायला गेलो होतो. आमच्या अगोदरचा शो पाहून लोक थिएटरबाहेर पडत होते आणि त्यात कादंबरी एका पुरुषासोबत थिएटरबाहेर पडताना दिसली. तिची आणि आमची नजरानजर झाली. ती ओशाळली आणि बघून न बघितल्यासारखं करून निघून गेली.

या दरम्यान रमेशने केलेल्या असभ्य टिपण्णीने माझा राग अनावर झाला होता. माझ्या वागण्यातील या बदलाने रमेश चिडला. थोड्या वेळाने रमेशने माझा खांदा धरून मला हलवलं आणि विचारलं, ''अरे काय झालं तुला? का इतका चिडलायस?'' मी रमेशला म्हणालो, ''रमेश, कादंबरी ही आपली लहानपणीची मैत्रीण आहे. तिच्यासोबत आपण एकत्र वाढलो, खेळलो, तिच्या आयुष्यात आलेल्या संकटांना आपण जवळून पाहिलंय.''

''वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी वैधव्य नशिबी आलेल्या तिने एवढं मोठं उभं आयुष्य कसं काढायचं? कादंबरीच्या परिस्थितीचा विचार न करता तिला चुकीचं ठरवणं योग्य नाही. माझं म्हणणं रमेशला पटलं. त्याने माझ्या खांद्यावर पुन्हा हात ठेवला आणि खरंच चुकलं माझं असं म्हणून सॉरी म्हटलं. मी रमेशला म्हणालो, ''हे बघ, आज आपण इथे जे काही पाहिले, ते इथेच विसरून जायचं. याची कुणाकडेही कसलीही वाच्यता करावयाची नाही.'' आम्ही चहा संपवला आणि घरी आलो. पुढे दोन-तीन दिवस कादंबरी दिसली; परंतु ती नेहमीसारखी बोलत नव्हती. पाहून न पाहिल्यासारखी करत होती. तिला खूप अवघडल्यासारखं वाटत होते. आयुष्यात जे काही करशील ते विचारपूर्वक कर, असं म्हणून मी तिथून लगेच निघालो आणि मनाशी ठरवलं, कादंबरीला अवघडल्यासारखं वाटू नये म्हणून यापुढे आपण तिला शक्य तेवढं टाळायचं. तिलाही तिचं आयुष्य आहे, सतत जबाबदारीच्या ओझ्याखाली दबून राहणं आणि आयुष्यभर दुःख कवटाळत बसणं हे काही आयुष्य होऊ शकत नाही. तिला तिचं आयुष्य जगण्याचं पूर्ण स्वातंत्र्य आणि अधिकारही आहे. तिला तिच्या पद्धतीने जगता आलं पाहिजे. जबाबदारीच्या ओझ्याखाली कादंबरी नावाचं जहाज टायटॅनिकसारखं बुडून जायला नको.

आयुष्य कुणावर अवलंबून राहून जगता येत नाही; परंतु काही वेळा विश्वास ठेवूनच आयुष्य जगावं लागतं. आयुष्य सुंदर आहे आणि ते सुंदर कसं करायचं, याच आकलन त्या विधात्याने प्रत्येकाला दिले आहे. त्याप्रमाणे कादंबरी तिचं आयुष्य सुंदर करेल, असा माझा विश्वास आहे.

**(उपसचिव, महाराष्ट्र शासन.)**

***शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी पारंपरिक करिअरच्या चौकटीपलीकडे जाऊन आपल्या आवडी, कौशल्य आणि उद्योजकीय दृष्टिकोनातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अशाच 'वेगळ्या वाटे'वर आत्मविश्वासाने वाटचाल करत नवे क्षितीज गाठणाऱ्या युवा उद्योजकांमध्ये विधानमंडळ सचिवालयाचे सचिव डॉ. विलास आठवले यांचे सुपुत्र लकी विलास आठवले यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.***

# उद्योजकीय भरारी

## लकी विलास आठवले

मसाले उद्योगातील संधी ओळखून त्यांनी 'कृषिदेव मसाले' या उपक्रमाची सुरुवात केली आहे. पारंपरिक खाद्य संस्कृती, गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि आधुनिक उद्योजकतेचा संगम साधत त्यांनी व्यवसाय क्षेत्रात नवी वाट निवडली आहे. त्यांच्या या वेगळ्या करिअर प्रवासाची प्रेरणा काय होती, 'कृषिदेव मसाले'ची संकल्पना कशी आकाराला आली आणि या उद्योगातील त्यांची भविष्यातील वाटचाल कशी असेल, हे जाणून घेऊ या...

### प्रश्न : 'कृषिदेव मसाले' या व्यवसायाची सुरुवात कशी झाली? या मागची प्रेरणा काय होती?

**उत्तर :** मसाले हा आपल्या भारतीय खाद्य संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. आपल्या रोजच्या स्वयंपाकात वापरल्या जाणाऱ्या मसाल्यांमध्ये मोठ्या व्यवसायाची; तसेच गुणवत्तापूर्ण उत्पादन देण्याची संधी आहे, हे जाणवले. पारंपरिक चव, दर्जेदार कच्चा माल आणि आधुनिक उत्पादन पद्धती यांचा संगम साधून ग्राहकांना शुद्ध, गुणवत्तापूर्ण आणि विश्वासार्ह मसाले उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'कृषिदेव मसाले' या व्यवसायाची सुरुवात केली. स्वतःच्या आवडीला व्यावसायिक दृष्टिकोनाची जोड देत काहीतरी वेगळे निर्माण करण्याची इच्छा ही या उद्योगामागची प्रमुख प्रेरणा होती.

### प्रश्न : 'कृषिदेव मसाले' हे नाव निवडण्यामागची संकल्पना काय आहे?

**उत्तर :** 'कृषिदेव' या नावामध्ये कृषी आणि अन्न संस्कृतीशी जोडलेली भावना आहे. आपल्या अन्नाचा मूळ आधार हा शेतकरी आणि शेती आहे. शेतातून आलेल्या गुणवत्तापूर्ण उत्पादनाचे मूल्यवर्धन करून ते ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राशी असलेले नाते आणि भारतीय खाद्य परंपरेबद्दलचा आदर या भावनेतून 'कृषिदेव मसाले' हे नाव निवडले.

### प्रश्न : आपण कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतर मसाले उद्योगात उतरण्याचा निर्णय कसा घेतला?

**उत्तर :** माझे शिक्षण एल.एल.एम.पर्यंत झाले असले, तरी सुरुवातीपासूनच मला व्यवसाय आणि उद्योजकतेची आवड होती. कायद्याचे शिक्षण घेत असताना विश्लेषण करण्याची क्षमता, निर्णयक्षमता, व्यवस्थापन आणि शिस्त या गुणांचा विकास झाला. पुढे याच कौशल्यांचा उपयोग व्यवसाय उभारण्यासाठी करता येईल, असा विचार मनात होता. मसाले हा आपल्या दैनंदिन जीवनाशी आणि महाराष्ट्राच्या खाद्य संस्कृतीशी जोडलेला व्यवसाय आहे. घरगुती चवीपासून व्यावसायिक बाजारपेठेपर्यंत मसाल्यांना मोठी मागणी आहे. त्यामुळे पारंपरिक क्षेत्राला आधुनिक विचार, दर्जेदार उत्पादन आणि विश्वासार्ह ओळख निर्माण करण्याची संधी मला दिसली.

### प्रश्न : 'कृषिदेव मसाले'च्या उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत आपण कोणती विशेष काळजी घेता?

**उत्तर :** मसाल्यांची गुणवत्ता ही आमच्यासाठी सर्वांत महत्त्वाची बाब आहे. उत्पादनांमध्ये कोणत्याही प्रकारचे कृत्रिम रंग वापरले जात नाहीत. चांगल्या दर्जाचा आणि गुणवत्तापूर्ण कच्चा माल निवडण्यापासून उत्पादन प्रक्रियेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर आवश्यक ती काळजी घेतली जाते. मसाल्यांची नैसर्गिक चव, सुगंध आणि गुणवत्ता कायम राहावी, यावर आमचा विशेष भर आहे. ग्राहकांना शुद्ध, सुरक्षित आणि विश्वासार्ह उत्पादन देणे, हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### प्रश्न : उत्पादन प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा कितपत वापर केला जातो?

**उत्तर :** पारंपरिक चव आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा समतोल साधण्यावर आमचा भर आहे. उत्पादनाची स्वच्छता, प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, पॅकिंग आणि साठवणूक या विविध टप्प्यांमध्ये आधुनिक पद्धतींचा वापर केला जातो. तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्पादनाची गुणवत्ता सातत्याने राखता यावी आणि ग्राहकांना प्रत्येक वेळी समान दर्जाचे उत्पादन मिळावे, यासाठी आवश्यक त्या आधुनिक प्रक्रियांचा अवलंब केला जातो.

### प्रश्न : उत्पादनांच्या पॅकिंग आणि साठवणुकीसाठी कोणती विशेष काळजी घेतली जाते?

**उत्तर :** मसाल्यांची गुणवत्ता आणि सुगंध दीर्घकाळ टिकवण्यासाठी पॅकिंग आणि साठवणूक अत्यंत महत्त्वाची आहे. उत्पादनांना आर्द्रता, हवा आणि प्रकाशापासून शक्य तितके संरक्षण मिळेल, याची काळजी घेतली जाते. स्वच्छता, योग्य तापमान आणि सुरक्षित साठवणूक याबरोबरच पॅकिंगची गुणवत्ता याकडे विशेष लक्ष दिले जाते. ग्राहकांपर्यंत उत्पादन पोहोचेपर्यंत त्याचा दर्जा कायम राहावा, हा आमचा प्रयत्न असतो.

**प्रश्न : आपल्या उद्योगप्रवासात आपल्या कुटुंबाचे, विशेषत: आपल्या आईचे सहकार्य कसे लाभले?**

**उत्तर :** या उद्योगाच्या प्रवासात माझी आई स्नेहप्रभा आठवले व वडील विलास आठवले यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. माझ्या निर्णयांवर विश्वास ठेवण्यापासून ते व्यवसायातील विविध टप्प्यांवर प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करण्यापर्यंत त्यांची साथ कायम राहिली. आईचे तिच्या अनुभवातून मिळालेले मार्गदर्शन आणि खंबीर पाठिंबा माझ्यासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरला आहे. त्यामुळे 'कृषिदेव मसाले'च्या वाटचालीत माझ्या आईचा वाटा माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

**प्रश्न : आपल्या उद्योगातून किती जणांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत?**

**उत्तर :** उद्योगाची सुरुवात ही केवळ स्वत:साठी व्यवसाय निर्माण करण्यापुरती मर्यादित नसते, तर त्यातून इतरांसाठीही रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण व्हाव्यात, हा आमचा प्रयत्न आहे. उत्पादन, पॅकिंग, वितरण, वाहतूक आणि विक्री या विविध टप्प्यांमध्ये प्रत्यक्ष; तसेच अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. व्यवसायाचा विस्तार जसजसा वाढेल, तसतशा या संधीही वाढवण्याचा आमचा मानस आहे.

**प्रश्न : ई-कॉमर्स आणि सोशल मीडियाचा आपल्या व्यवसायाच्या विस्तारासाठी कसा उपयोग होत आहे?**

**उत्तर :** आजच्या डिजिटल युगात व्यवसायाच्या विस्तारासाठी ई-कॉमर्स आणि सोशल मीडिया ही प्रभावी माध्यमे आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्राहकांशी थेट संवाद साधता येतो, उत्पादनांची माहिती पोहोचवता येते आणि ग्राहकांचा अभिप्रायही मिळवता येतो. ई-कॉमर्समुळे स्थानिक बाजारपेठेच्या पलीकडे जाऊन अधिक व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचण्याची संधी मिळते. 'कृषिदेव मसाले'ची उत्पादने सध्या ॲमेझॉन, ब्लिंकिट आणि इन्स्टा मार्ट यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून ग्राहकांपर्यंत सहज पोहोचणे आणि व्यवसायाचा विस्तार अधिक व्यापक स्तरावर करण्यावर आमचा भर आहे.

**प्रश्न : भविष्यात या व्यवसायाच्या विस्तारासाठी आपल्या कोणत्या योजना आहेत?**

**उत्तर :** सध्या आम्ही उत्पादनांची गुणवत्ता, ग्राहकांचा विश्वास आणि ब्रँडची विश्वासार्हता यावर विशेष लक्ष केंद्रित करत आहोत. भविष्यात उत्पादनांची विविधता वाढवण्याबरोबरच अधिक व्यापक बाजारपेठेत उत्पादने पोहोचवण्याचा मानस आहे. महाराष्ट्रासह देशभरातील ग्राहकांपर्यंत दर्जेदार मसाले पोहोचवणे आणि भारतीय खाद्य संस्कृतीशी जोडलेला विश्वासार्ह ब्रँड म्हणून 'कृषिदेव मसाले'ची ओळख निर्माण करणे, हे आमचे ध्येय आहे.

**प्रश्न : आज उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या तरुण उद्योजकांना आपण कोणता संदेश द्याल?**

**उत्तर :** तरुणांनी करिअर करताना केवळ पारंपरिक पर्यायांचा विचार न करता आपल्या आवडी, कौशल्य आणि क्षमतेनुसार वेगळ्या क्षेत्रांचा शोध घ्यावा. व्यवसाय सुरू करताना सुरुवातीला अडचणी येतात. मात्र सातत्य, गुणवत्तेवरचा विश्वास आणि ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याची वृत्ती असेल, तर त्या अडचणींवर मात करता येते. मोठी संधी मिळण्याची वाट पाहण्यापेक्षा छोट्या संधीचे मोठ्या कल्पनेत रूपांतर करण्याचा प्रयत्न करावा. स्वत:ची वेगळी वाट निवडा, प्रामाणिकपणे मेहनत करा आणि शिकण्याची प्रक्रिया कधीही थांबवू नका.

**शब्दांकन : शैलजा पाटील,** सहायक संचालक, महाराष्ट्र शासन.

---

# बिनखांबी गणेश मंदिर

करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी अर्थात आई अंबाबाईच्या परिसरामध्ये अनेक मंदिरे आपल्याला पाहायला मिळतात. यामध्ये कपिलेश्वर, काशी विश्वेश्वर, श्री जोतिबा मंदिर, श्री भवानी मंडप येथील श्री तुळजाभवानी मंदिर, रंकभैरव व बिनखांबी गणेश मंदिर या मंदिराच्या नावाला एक महत्त्व आहे. या मंदिरामध्ये आपल्याला खांब आढळून येत नाहीत. या मंदिराची बांधणी करताना एकही खांबाचा वापर केला गेला नाही, म्हणून या मंदिराला बिनखांबी गणेश मंदिर म्हटले जाते. गणेश विसर्जन मिरवणुकीचा केंद्रबिंदू असलेले हे ठिकाण आहे.

पूर्वी ज्या ठिकाणी हे मंदिर आहे, त्याच्या पाठीमागे जोशीरावांचा वाडा आहे. या वाड्याच्या विहिरीची डागडुजी करताना व गाळ काढताना येथे गणेशमूर्ती मिळाली. ती मूर्ती श्री. जोशी यांनी विहिरीच्या काठावर ठेवली होती. गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना श्री बिनखांबी गणेश मंदिरात करावी, अशी नागरिकांनी श्री. जोशी यांना विनंती केली व तत्कालीन छत्रपतींनी १८७० च्या कालावधीत या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. या गणपतीला जोशीराव गणपती म्हणूनही ओळखले जाते. आजही मूळ लहान मूर्ती मंदिरामध्ये आहे. सध्याच्या मूर्तीच्या डाव्या बाजूस श्री गणेशाची मूर्ती आहे.

**टीम आपलं मंत्रालय**

# मुख्यमंत्री फेलोशिप : प्रशासनाचा नवा दृष्टिकोन

**संजय डी. ओरके**

तरुणाईची ऊर्जा, नावीन्यपूर्ण विचार आणि प्रशासनाचा अनुभव यांचा संगम घडविणारा मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम हा केवळ युवकांसाठीचा अनुभवाधारित उपक्रम न राहता, प्रशासन अधिक गतिमान, संवेदनशील आणि लोकाभिमुख करण्याचे प्रभावी माध्यम ठरत आहे. शासकीय धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करताना प्रशासनाला नव्या कल्पना, आधुनिक तंत्रज्ञान आणि तरुणाईच्या सर्जनशील दृष्टिकोनाची जोड मिळावी, या उद्देशाने मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम राबविण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या तरुणांना राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये, दुर्गम भागात आणि शासकीय विभागांमध्ये प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळते. त्यामुळे प्रशासनाची कार्यपद्धती समजून घेतानाच समाजाच्या विविध स्तरांशी त्यांचा थेट संवाद घडतो. फेलोजच्या अनुभवांतून या उपक्रमाचे विविध पैलू प्रभावीपणे समोर येत असतात. महानगरांपासून ग्रामीण व आदिवासी भागांपर्यंतचा प्रवास, प्रशासकीय यंत्रणेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव, तंत्रज्ञानाचा वापर, संशोधनाधारित धोरणनिर्मिती आणि समाजाशी निर्माण झालेले नाते या सर्वांचा यात समावेश असतो.

## कम्फर्ट झोनच्या पलीकडचा महाराष्ट्र

मुख्यमंत्री फेलोशिपचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तरुणांना त्यांच्या परिचित वातावरणाच्या बाहेर जाऊन महाराष्ट्र समजून घेण्याची मिळालेली संधी. विदर्भातील तरूण पश्चिम महाराष्ट्राचा सामाजिक–सांस्कृतिक अनुभव घेतो, तर महानगरांमधून आलेल्या फेलोजना ग्रामीण आणि आदिवासी भागातील जीवनशैली, संस्कृती आणि स्थानिक प्रश्न जवळून अनुभवता येतात. यामुळे केवळ भौगोलिक अंतरच कमी होत नाही, तर सामाजिक संवादातील अंतरही दूर झाले. कॉर्पोरेट किंवा आधुनिक जीवनशैलीतील 'हाय–हॅलो'पासून स्थानिक नागरिकांशी सहजपणे संवाद साधणाऱ्या 'नमस्कार, बोला'पर्यंतचा प्रवास हा फेलोजच्या व्यक्तिमत्त्वातील बदल अधोरेखित करणारा ठरला.

## 'पब्लिक मनी'ची जबाबदारी आणि प्रशासनाची वास्तवता

शिक्षणातून मिळणारे ज्ञान आणि प्रत्यक्ष शासकीय कामकाज यातील फरक फेलोशिपदरम्यान प्रकर्षाने जाणवतो. बाहेरून पाहताना शासकीय नियम, प्रक्रिया आणि पडताळणी व्यवस्था ही 'रेड टेपिसम' वाटू शकते; मात्र प्रत्यक्ष काम करताना प्रत्येक नियमामागे सार्वजनिक पैशाची जबाबदारी असल्याची जाणीव होते. शासनाचा प्रत्येक रुपया हा जनतेचा पैसा असल्यामुळे निर्णय कायदेशीर, पारदर्शक आणि लेखापरीक्षणास उत्तरदायी असणे आवश्यक आहे, हे फेलोजना प्रत्यक्ष अनुभवातून समजते. त्याचबरोबर कागदावर अत्यंत प्रभावी दिसणाऱ्या योजना प्रत्यक्ष जमिनीवर राबविताना येणारी स्थानिक आव्हाने, प्रशासकीय अडचणी आणि नागरिकांच्या अपेक्षा यांचा जवळून परिचय होतो. या अनुभवामुळे योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक आणि लोकाभिमुख होते.

## तंत्रज्ञान आणि कौशल्यांचा प्रशासनाला हातभार

विविध शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रांतून आलेल्या फेलोजच्या कौशल्यांचा थेट उपयोग जिल्हा प्रशासनाच्या कामकाजात होतो. डेटा सायन्स आणि मॅनेजमेंटची पार्श्वभूमी असलेल्या फेलोजचा विशेष मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील महत्त्वाचा डेटा मुख्यमंत्री डॅशबोर्डशी जोडण्यास हातभार लागतो. त्यामुळे निर्णयप्रक्रियेत डेटा आणि तंत्रज्ञानाचा वापर अधिक प्रभावी करण्यास मदत होतो. या मुख्यमंत्री फेलोशिमुळे शिक्षणाच्या क्षेत्रात काही प्रकल्पांतर्गत सरकारी जागांचे आधुनिक वाचनालयांमध्ये रूपांतर होते, तर काही शहरातील गरजू विद्यार्थ्यांना जेईई आणि नीट परीक्षांसाठी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येते. त्याचबरोबर अंगणवाडी सेविकांच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून बालकांमधील तीव्र कुपोषण कमी करण्याच्या प्रयत्नांना चालना मिळते.

## आयआयटी बॉम्बेसोबत संशोधनाधारित प्रशासन

फेलोशिपमध्ये प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभवाला संशोधनाची जोड देण्यासाठी आयआयटी बॉम्बेसोबत 'पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम इन पब्लिक पॉलिसी' हा अभ्यासक्रम राबविण्यात येतो. या माध्यमातून समस्येकडे केवळ वरवर न पाहता तिच्या मूळ कारणांचा शोध घेणे, उपलब्ध डेटाचे विश्लेषण करणे आणि त्यावर आधारित धोरणात्मक उपाय सुचविणे यावर भर देण्यात येतो. तसेच एमएसएमई क्षेत्राला कर्ज मिळताना येणारे अडथळे, मिशन मोडवरील शासकीय मोहिमांचे सातत्य कसे टिकवावे आणि वनीकरण प्रकल्पांना कार्बन फायनान्सशी कसे जोडता येईल, यांसारख्या विषयांवर फेलोज संशोधन करतात. त्यामुळे प्रशासनातील प्रत्यक्ष अनुभवाला शैक्षणिक आणि संशोधनाची भक्कम जोड मिळते.

## 'सोशल कॅपिटल'ची निर्मिती

मुख्यमंत्री फेलोशिपचा सर्वांत दीर्घकालीन परिणाम म्हणजे या कार्यक्रमातून निर्माण होणारे सामाजिक आणि प्रशासकीय नेटवर्क. प्रशासकीय अधिकारी, विषयतज्ज्ञ, लोकप्रतिनिधी आणि तळागाळातील नागरिकांशी निर्माण झालेला संवाद हा फेलोजच्या पुढील वाटचालीतील महत्त्वाचा 'सोशल कॅपिटल' ठरतो. फेलोशिप पूर्ण झाल्यानंतर हे तरुण प्रशासन, खासगी क्षेत्र, सामाजिक क्षेत्र किंवा उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात गेले, तरी शासनव्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव, समाजाच्या प्रश्नांची जाण आणि महाराष्ट्राच्या विकासाशी जोडलेली बांधिलकी त्यांच्यासोबत राहते.

## अनुभवातून नवे नेतृत्व घडते

मुख्यमंत्री फेलोशिप हा एका वर्षाचा प्रशासकीय अनुभव नाही; तो तरुणांच्या विचारविश्वात आणि व्यक्तिमत्त्वात घडणारा परिवर्तनाचा प्रवास आहे. महाराष्ट्राची विविधता अनुभवताना समाजाशी जोडले जाणे, शासकीय व्यवस्थेची जबाबदारी समजून घेणे, तंत्रज्ञान आणि संशोधनाचा उपयोग करून समस्या सोडविणे आणि सार्वजनिक हिताला केंद्रस्थानी ठेवून काम करणे, या मूल्यांची रुजवण या कार्यक्रमातून होत असते. युवा ऊर्जा आणि प्रशासनाचा अनुभव यांचा हा संगम भविष्यातील संवेदनशील, तंत्रकुशल आणि परिणामकारक नेतृत्व घडविण्यास निश्चितच हातभार लावणारा ठरतो. मुख्यमंत्री फेलोशिप म्हणजे प्रशासन समजून घेण्याचा प्रवास असला, तरी त्यापलीकडे तो विकसित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सक्षम युवा शक्ती घडविण्याचा प्रयत्न आहे, असेच या कार्यक्रमाद्वारे होताना दिसत आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन.)**

# आनंदी जगणं...

**अश्विनी धावणे**

विचार करणं हे माणसाला मिळालेलं सर्वोच्च वरदान. याच विचारांचे फलद्रूप म्हणजे आजवरची प्रगती. विचारांची दिशा योग्य असली की, सर्वच अतिउत्तम. सतत एकच विचार मनामध्ये असणं/एकापाठोपाठ सलग विचाररूपी मोत्यांची माळ मनात गुंफत राहणं, पर्यायाने अतिविचारास आमंत्रणच.



सध्या माझ्या जीवनात अतिविचारास अमूल्य स्थान प्राप्त झालेय. निर्णय घेण्याला महत्त्व आहे. सतत माझा निर्णय बरोबरच आला पाहिजे, या विचारात गुंतून पडले की, निर्णय घेताच येणार नाही.

ऑफिसचा कॉम्प्युटर लॉग आऊट केला, तरी मनातून ऑफिसचं काम/ती परिस्थिती काही केल्या डोक्यातून लॉग आऊट होत नाही. जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी फक्त तोच विचार हृदयात घर करून राहतो. अतिविचार म्हणजे गरजेपेक्षा जास्त विचार/चिंता यामुळे भरपूर शारीरिक, मानसिक ऊर्जा खर्च होते, त्याचा परिणाम म्हणजे अस्वस्थपणा... जो फक्त आपण स्वतःच अनुभवू शकतो. दुसऱ्याच्या हृदयात तुम्ही तो उतरवू शकणार नाही.

आजकाल प्रत्येकाचं आयुष्य हे चिंताग्रस्त, भरपूर ताणाचं आहे. त्यामुळे ताण हा जीवनाचा भाग आहे, असं समजून आपल्यापैकी माझ्यासारखे अनेक लोक जगत आहेत. अनेकविध ताण, स्पर्धा, तुलना, असमाधान, चिंता, मानसिक अशांतता हेच जीवन समजून याचा स्वीकार करतोय. त्यामुळे कुठलाही प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच जटिल/गुंतागुंतीचा होत जातो. अशावेळी कोणीतरी आधार देणारं हवं असतं. शाब्दिक मारा... सुकलेल्या बंजर जमिनीला पावसाचा एक शटकारही जसा सुगंधितपणे शहारून जातो, तसा तो कळवळलेल्या मनासही धीर देऊन जातो. शारीरिक आरोग्यास समतुल्य मानसिक आरोग्य असते, हे आपण मान्यच करीत नाही. शारीरिक व्याधी जाणवली की, डॉक्टरकडे जातो. मात्र मानसिक व्याधी दुर्लक्षित करतो. हळूहळू ती कीड लागलेल्या झाडाप्रमाने आतून पोखरायला सुरुवात करते, तेव्हा वेळीच जागं होणं गरजेचं...

आधी स्व स्वीकारणं फार आवश्यक आहे.

केवळ आनंदी/खुश वाटत राहणं म्हणजे आपलं मानसिक आरोग्य चांगलं आहे, अशी कल्पना नव्हे. आनंदी अवस्था आणि चांगली मन:स्थिती यात साम्य भासेल; पण फक्त आनंद म्हणजे चांगली मानसिक अवस्था होणार नाही. कारण एखाद्या व्यक्तीला दुसऱ्याला त्रास देऊन आनंद मिळत असेल, तर ती चांगली मानसिक अवस्था म्हणता येणार नाही. ती नकारात्मक भावना होईल. आनंद मिळवणं हे एकमेव मानसिक आरोग्याचं ध्येय न होता आपल्या ध्येयाकडे जाण्यासाठी आपले सकारात्मक आणि नकारात्मक गुण यांची सांगड घालून केलेला सहिष्णू प्रवास म्हणजे मानसिक आरोग्य असावं...

**(पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# डिजिटल डिटॉक्स म्हणजे काय?

आजच्या डिजिटल युगात मोबाइल, सोशल मीडिया, इंटरनेट, ऑनलाइन मनोरंजन आणि विविध ॲप्स आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहेत. काम, शिक्षण, संवाद आणि मनोरंजनासाठी तंत्रज्ञान आवश्यक असले, तरी त्याचा अतिवापर आपल्या वेळेवर, एकाग्रतेवर आणि वैयक्तिक आयुष्यावर परिणाम करू शकतो. अशा वेळी काही काळ जाणीवपूर्वक डिजिटल साधनांपासून दूर राहणे म्हणजे 'डिजिटल डिटॉक्स'.

डिजिटल डिटॉक्स म्हणजे मोबाइल किंवा इंटरनेटचा पूर्णपणे त्याग करणे नव्हे; उलट, डिजिटल साधनांचा आवश्यक आणि मर्यादित वापर करण्याची सवय लावणे हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे. उदाहरणार्थ, दिवसातील काही वेळ मोबाइलपासून दूर राहणे, जेवताना फोन न वापरणे, झोपण्यापूर्वी स्क्रिनचा वापर टाळणे, अनावश्यक नोटिफिकेशन बंद करणे किंवा आठवड्यातील काही वेळ सोशल मीडियापासून दूर राहणे, हे डिजिटल डिटॉक्सचे सोपे मार्ग आहेत.

डिजिटल डिटॉक्समुळे स्वतःसाठी वेळ मिळतो. वाचन, व्यायाम, छंद, कुटुंबीयांशी संवाद किंवा निसर्गाच्या सहवासासाठी अधिक वेळ देता येतो. सतत येणाऱ्या संदेशांपासून आणि नोटिफिकेशनपासून थोडे दूर राहिल्याने कामावर लक्ष केंद्रित करण्यासही मदत होऊ शकते.

डिजिटल साधने आपल्या जीवनाचा भाग आहेत; मात्र त्यांचे आपल्या जीवनावर नियंत्रण राहू नये. तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रत्यक्ष जीवनातील अनुभव यांच्यात योग्य संतुलन साधणे, हाच डिजिटल डिटॉक्सचा खरा अर्थ आहे.

**टीम आपलं मंत्रालय**

# गणेश मंडळांच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी लोकसंवाद अभियान

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम १६ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात आला.

राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले असून, या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येणाऱ्या गणेश मंडळांच्या ठिकाणी लोकसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या योजनांची माहिती देण्याबरोबरच नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे आणि पात्र लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा 'लोकसंवाद-२०२६'चा प्रमुख उद्देश होता.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध शासकीय विभागांच्या स्थानिक; तसेच जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी नागरिकांना थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध झाली. विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात आली.

## विविध विभागांच्या योजनांची माहिती

प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख व मानाच्या गणेशोत्सव मंडळांमध्ये 'लोकसंवाद' कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

'लोकसंवाद-२०२६'मध्ये कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, पणन, सार्वजनिक आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण आदी विभागांसह सर्वच विभागांनी सहभाग घेतला.

शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे, कृषी अवजारांसाठी अनुदान, महिला बचत गट; तसेच महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या योजना; युवक आणि विद्यार्थ्यांसाठीच्या शिक्षण, कौशल्य विकास, शिष्यवृत्ती व सवलती यांसह विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली.

महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांसह मोफत तपासणी, औषधोपचार व शिष्यवृत्तीशी संबंधित सुविधांची माहिती देण्यात आली.

कौशल्य विकास क्षेत्रात कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगार कर्ज योजना; तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती आदी संस्थांच्या योजनांबाबत युवक व नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय महाडीबीटी, सायबर सुरक्षा, माहितीचा अधिकार आणि आपले सरकार यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही जनजागृती करण्यात आली.

## आंतरविभागीय समन्वयावर भर

'लोकसंवाद-२०२६' प्रभावीपणे राबविण्यासाठी कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, सहकार, पणन, कौशल्य विकास, सामाजिक न्याय; तसेच पोलीस विभागासह संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात आला.

या कार्यक्रमांमध्ये स्थानिक क्षेत्रीय अधिकारी; तसेच जिल्हास्तरीय वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञ यांनी प्रत्यक्ष गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन केले. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांबाबत नागरिकांना थेट आणि अधिकृत माहिती उपलब्ध झाली.

**टीम आपलं मंत्रालय**

# डिजिटल गणेश कॅलिग्राफी ... अजय भोसले







# लिहिते व्हा... आपलं मंत्रालय



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' हे गृहपत्रिका करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, विशेष छायाचित्रे, व्यंगचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती या संदर्भातील साहित्य (युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात) खालील दिलेल्या ई-मेलवर पाठवावेत.

















## आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, १७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई. ई-मेल : **aaplemantralay@gmail.com**

**Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR**

**Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR**